वसई विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार (पश्चिम), ता.वसई, जि.पालघर पिन नं.401303
दुरध्वनी :- 0250-2525101/02/03/04/05/06 फॅक्स :- 0250-2525107
ई-मेल :- vasaivirarcorpoation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र. :-** 1301

विभाग :- क्रीडा विभाग
दिनांक :- 1/10/2025

**प्रस्तावाचा विषय :-** गणपती विसर्जन करणाऱ्या जिवरक्षकाचा विमा काढणेसाठी मे.दि ओरिएण्टल इंश्योरेंस कंपनी लिमिटेड यांचे दरपत्रकास मंजुरी देवून त्याकामी होणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** यावर्षी गणेश उत्सव दिनांक २७/०८/२०२५ ते दि.२२/०९/२०२५ रोजी या कालावधीत मोठ्या उत्साहात महानगरपालिका हद्दीत साजरा केला जाणार आहे.

दि.२५/०८/२०२५ रोजीच्या गणपती उत्सव बैठकीत मा.आयुक्त महोदयांनी गणपती विसर्जन करणाऱ्या जिवरक्षकाचा दुखापत व मृत्यूमुखी पडण्याची शक्यता विचारात घेता, महानगरपालिका मार्फत गणपती विसर्जन करणाऱ्या जिवरक्षकाचा अपघात विमा संरक्षण देण्याचे आश्वासन देण्यात आले होते.

यावर्षी साजरा होणाऱ्या गणपती विसर्जन करणाऱ्या जिवरक्षकाना विमा संरक्षण देणेकामी मे. दि ओरिएण्टल इंश्योरेंस कंपनी लिमिटेड यांनी दिनांक २८/०८/२०२५ रोजी क्रीडा विभागात ईमेलद्वारे कोटेशन सादर केले आहे. सादर केलेल्या कोटेशन नुसार गणपती विसर्जन करणाऱ्या जिवरक्षकाचा अपघात विमा संरक्षणाची माहिती खालील प्रमाणे आहे.

**तक्ता (अ)**

| | |
|---|---|
| Insurance Details | GPA NAMED Insurances for the Lifeguards/Volunteers.<br>Accidental Injury only.<br>Coverage during Lifeguards works only. |
| Period of Insurance | From the time of payment of premium and receipt of list of Lifeguards in our office to 22/09/2025 |
| Premium per Govinda. | Rs. 50 /- per Lifeguard (incl. GST ) |
| Specific Terms | • The Claim amount will be payable in the name of Lifeguard / Nominee only.<br>• List of All Lifeguards is must from VVMC. |
| Table of Benefits (Any One of the said benefits) | Accidental Death cover. Rs. 5,00,000 /- for each lifeguard<br>Loss of 2 Eyes / 2 Legs / 2 Hands cover. Rs. 5,00,000 /- for each lifeguard<br>Loss of 1 Hand / 1 Leg / 1 Eye cover. Rs. 2,50,000 /- for each lifeguard<br>Permanent Total Disablement cover. Rs. 5,00,000 /- for each lifeguard<br>Permanent Partial Disablement - % of Rs. 5,00,000 /- for each lifeguard ( as shown in the policy )<br>Actual Hospitalisation expenses maximum upto Rs. 50,000 /- per lifeguard ( Reimbursements only )<br>Excess/Deduction : Rs. 2,000/- per claim. |
| Special Exclusions | • Intoxication of Alchohol/Drugs will be strictly not be allowed.<br>• Treatment from Non Registered Doctors will not be allowed. |
| Insurance Procedure | • VVMC will provide us the Verified List of lifeguards alongwith the relative premium.<br>• We will issue Group Personal Accident (Named ) Insurance Policy in the name of VVMC as they will remit us the premium.<br>• We will issue Certificate of Insurance to VVMC alongwith the named list of Lifeguards.<br>• At the time of claim, lifeguard has to produce Insurance Certificate and attested list alongwith all the necessary claim documents. |

वरील नमुद गणपती विसर्जन करणाऱ्या जिवरक्षकाचा अपघात विमा संरक्षण करिता सादर केलेल्या तक्ता (अ) कोटेशनचे अवलोकन केले असता मे.दि ओरिएण्टल इंश्योरेंस कंपनी लिमिटेड यांनी प्रस्तावात नमुद सादर केलेल्या प्रमाणे गणपती विसर्जन करणाऱ्या जिवरक्षकाचा अपघात विमा काढणेसाठी प्रति व्यक्ती रु.५०/- (दर GST सहीत) प्रिमीयमची रक्कम आहे.

गणपती विसर्जन करणाऱ्या जिवरक्षकाचा अपघात विमा संरक्षणसाठी गणपती विसर्जन करणाऱ्या १५०० जिवरक्षकाचा विमा उतरविणेकामी प्रस्ताव सादर करण्यात येत असून मे.दि ओरिएण्टल इंश्योरेंस कंपनी लिमिटेड यांनी कोटेशन मध्ये नमुद केलेल्या प्रती दराप्रमाणे गणपती विसर्जन करणाऱ्या सुमारे १५०० जिवरक्षकाचा रु.५०/- प्रमाणे तात्पुरता विमा काढल्यास रु.७५,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. तसेच गणपती विसर्जन करणाऱ्या जिवरक्षकाचा विमा काढणेकामी आगाऊ रक्कम मिळावी याकरिता मे.दि ओरिएण्टल इंश्योरेंस कंपनी लिमिटेड यांनी दिनांक.२८/०८/२०२५ रोजी सादर केलेल्या कोटेशन मध्ये नमूद केले आहे.

विमा काढणेसाठी दरपत्रके मागविणे शक्य नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमा मधील प्रकरण ५ संविदा मधील कलम २ (२) मधील तरतुदीनुसार निविदा न मागविता किंवा मागविल्यानंतर त्याचे कडिल ज्या कोणत्याही निविदा येतील त्या न स्विकारता संविदा करण्यास प्राधिकृत करता येणेबाबत तरतुद असून सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात सत्कार व इतर समारंभ, व्याख्यानमाला, वक्तृत्वस्पर्धा ग्रंथसंमेलन, गुणवंत शिक्षक सत्कार, व्यक्ती / संस्थासाठी महानगरपालिका भुषण पुरस्कार, महापौर चषक स्पर्धा व इतर सांस्कृतिक आणि क्रीडा कार्यक्रम या लेखाशिर्षाखाली एकूण तरतुद १८ कोटी इतकी करण्यात आलेली आहे.सदरचा खर्च नमुद लेखाशिर्षामधून भागविणे शक्य होणार आहे.

तरी गणपती विसर्जन करणाऱ्या जिवरक्षकाचा तात्पुरता अपघात विमा काढणेसाठी मे.दि ओरिएण्टल इंश्योरेंस कंपनी लिमिटेड यांनी सादर केलेल्या दरपत्रकास मान्यता देवून सुमारे १५०० जिवरक्षकाचा विमा काढणेकामी रुपये ५० प्रमाणे होणारी एकुण रक्कम रु.७५,०००/- खर्चास व मे. दि ओरिएण्टल इंश्योरेंस कंपनी लिमिटेड यांना याकामी त्यानी मागणी केल्याप्रमाणे पुर्ण रक्कम आगाऊ स्वरुपात अदा करणेकामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.आयुक्त तथा प्रशासक यांचे अंतीम मान्यतेसाठी ठेवणेस सविनय सादर.

**ठराव :-** गणपती विसर्जन करणाऱ्या जिवरक्षकाचा अपघात विमा काढणेसाठी ई-निविदा व दरपत्रके मागविणे शक्य नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाला जोडलेल्या अनुसुची ड मधील प्रकरण ५ संविदा या मधील नियम ५ (२) (२) नुसार निविदा न मागवता किंवा त्यांच्याकडे ज्या कोणत्याही निविदा येतील त्या न स्विकारता व तरतुदीनुसार करारनामा न करता येणेबाबत तरतुद आहे. त्यास अनुलक्षुन वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील गणपती विसर्जन करणाऱ्या जिवरक्षकाचा महानगरपालिकेमार्फत मोफत अपघात विमा काढण्यासाठी मे. दि ओरिएण्टल इंश्योरेंस कंपनी लिमिटेड यानी सादर केलेल्या प्रती ५०/- रुपये (सर्व करासहीत) या दरपत्रकास मान्यता देण्यात येत आहे.

तसेच मे. दि ओरिएण्टल इंश्योरेंस कंपनी लिमिटेड या कंपनीला गणपती विसर्जन करणाऱ्या जिवरक्षकाचा विमा उतरविण्यासाठी एकुण १५०० जिवरक्षक यांच्या विम्यासाठी रुपये रु.७५,०००/- इतकी रक्कम आगाऊ स्वरुपात अदा करण्यास व त्याकामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यांत येत आहे.

मनोजकुमार सुर्यवंशी (भा.प्र.से.)
आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, यशवंत नगर, विरार (प.) जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०३
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com


---

**प्रशासकीय ठराव क्र.** 1302

विभाग :- सार्व. बांधकाम
दिनांक :- ०१/10/ २०२५

---

**प्रस्तावाचा विषय :-** सन २०२५-२६ या वित्तीय वार्षिक वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती ए, बी, सी, डी, ई, एफ, जी, एच, आय कार्यक्षेत्रातील रस्त्यावरील खड्डे बुजविणे, डागडुजी वगैरे कामे करणे कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देऊन ई-निविदा कार्यप्रणालीव्दारे बी-१ निविदा दर मागविणे कामी मान्यता मिळणे बाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** सादर करण्यात येते की, वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात सुमारे १०१६ कि.मी. इतक्या लांबीचे डांबरीकरण केलेले रस्ते आहेत. वसई विरार भुप्रदेश हा अति पर्जन्यशील क्षेत्रामध्ये येत असून दरवर्षी पावसाळ्या दरम्यान सुमारे २२२५ मी.मी. ते २५०० मी.मी. इतकी विक्रमी पावसाची नोंद होते. त्यामुळे वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात अतिवृष्टी निर्माण होते.

सतत पडणाऱ्या पावसामुळे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विविध रस्त्यांवर भरपूर प्रमाणात खड्डे पडतात. रस्त्यावरील पडलेल्या खड्ड्यांमुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच दिवाळी व महानगरपालिका मॅरोथॉन पुर्वी सदरील खड्डे तातडीने बुजविणे आवश्यक असतात.

त्यामुळे सदर कामासाठी सन २०२५-२६ ह्या वित्तीय वार्षिक वर्षाकरीता बी-१ निविदा दर मागविणे आवश्यक आहे.

सन २०२५-२६ या वित्तीय वार्षिक वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती ए, बी, सी, डी, ई, एफ, जी, एच, आय कार्यक्षेत्रातील रस्त्यावरील खड्डे बुजविणे, डागडुजी वगैरे कामे करणेकामी रक्कम रुपये <u>६८,२७,०१,९७५/-</u> कोटी इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने सन २०२५-२६ या वित्तीय वार्षिक वर्षाकरीता खड्डे बुजविणे, डागडुजी वगैरे कामे करणेकामी रक्कम रुपये <u>६८,२७,०१,९७५/-</u> कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे.

त्याकरीता सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाकरीता रस्त्यावरील खड्डे बुजविणे, डागडुजी वगैरे कामे करणेकामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी घेणे आवश्यक आहे.

सदर कामाचा खर्च <u>''सर्वसाधारण नियमित रस्ते दुरुस्ती व विकसीत करणे''</u> या लेखाशिर्ष अंतर्गत भागविण्यात येणार आहे.

तरी वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती ए ते आय मधील रस्त्यावरील खड्डे बुजविणे, डागडुजी वगैरे करणेकामी होणाऱ्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधि.१९४९ चे कलम ६७(३) (क) अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याचे अधिकार मा. आयुक्त तथा प्रशासक ह्यांना आहेत.

तरी सदरचा प्रस्ताव मा. आयुक्त तथा प्रशासक ह्यांच्या मंजूरीस्तव सविनय सादर.

निर्णय :- सन २०२५-२६ या वित्तीय वार्षिक वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती ए, बी, सी, डी, ई, एफ, जी, एच, आय कार्यक्षेत्रातील रस्त्यावरील खड्डे बुजविणे, डागडुजी वगैरे कामे करणे कामी एकुण रक्कम रुपये ६८,२७,०१,९७५/- कोटी इतक्या होणाऱ्या अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत असून ई-निविदा कार्यप्रणालीव्दारे सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाकरीता बी-१ निविदा दर मागविणे कामी मान्यता देण्यात येत आहे.

मनोजकुमार सूर्यवंशी (भा.प्र.से)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, यशवंत नगर, विरार (प.) जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०३
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com


---

**प्रशासकीय ठराव क्र.** १३०३ विभाग :- सार्व. बांधकाम
दिनांक :-०१/१०/ २०२५

---

**प्रस्तावाचा विषय :-** **वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती ए, डी, ई, जी, एच व आय अंतर्गत विविध रस्ते खडीकरण व डांबरीकरण करणे कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देऊन ई-निविदा कार्यप्रणालीव्दारे बी-१ निविदा दर मागविणे कामी मान्यता मिळणे बाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर :-** सादर करण्यात येते की, वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती ए, डी, ई, जी, एच व आय अंतर्गत विविध डांबरीकरण केलेले रस्ते आहेत. वसई विरार भुप्रदेश हा अति पर्जन्यशील क्षेत्रामध्ये येत असून दरवर्षी पावसाळया दरम्यान सुमारे २५०० मी.मी. ते ३००० मी.मी. इतकी विक्रमी पावसाची नोंद होते. त्यामुळे वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात अतिवृष्टी निर्माण होते.

तसेच पावसाळयामध्ये अतिवृष्टीच्या वेळी रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचते व रस्त्यालगत गटार नसल्याने रस्त्यावरील पाण्याचा निचरा योग्य त्या वेळेत होत नाही. पाण्याचा निचरा न झाल्याने नागरीकांना वाहतुकीच्या वेळेत विविध अडचणींना सामोरे जावे लागते. त्याचप्रमाणे सध्यस्थितीमध्ये रस्त्याची सुमारे रुंदी २० ते ३० मी. असल्याने रस्त्यावरुन जाणारी वाहने अतिवेगाने जातात व रस्त्यास दुभाजक नसल्याने बहुतांश वाहने गती गाढणेकरीता आपल्या लेन सोडुन दुसऱ्या लेनमध्ये जातात निदर्शनास येते व ह्यामुळे बऱ्याचदा अपघात झाल्याचे देखील आढळुन आलेले आहे. रस्त्याच्या बाजुस असलेल्या दुकानदारांकडुन रस्त्याकरीता आरक्षित असलेल्या जागेमध्ये अतिक्रमण होत असल्याने देखिल निदर्शनास येत आहे.

त्यामुळे खालील नमुद कामासाठी बी-१ निविदा दर मागविणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती जी मधील बापाणे फाटा ते नायगाव रेल्वे स्थानक (पूर्व) पर्यत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | रु. ११,३२,९९,४१२/- |
| २ | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती जी मधील मधील सातीवली खींड ते रेंज ऑफीस पर्यत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | रु. १३,७३,३१,०४३/- |
| ३ | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती जी मधील मधील रेंज ऑफीस ते गोखीवरे तलाव पर्यतचा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | रु. २,५७,५५,६१६/- |
| ४ | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती डी व एच मधील गोखिवरे तलाव ते माणिकपूर नाक्यापर्यत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | रु. ५,८३,६९,९७२/- |
| ५ | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती एच व आय मधील माणिकपूर नाका ते दत्तानी मॉल पर्यतचा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | रु. १०,३०,००,१४२/- |
| ६ | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती आय कार्यक्षेत्रातील दत्तानी मॉल ते वसई गाव पर्यतचा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | रु. ४,१२,०४,५२१/- |

| | | |
|---|---|---|
| ७ | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती जी कार्यक्षेत्रातील वालीव गाव ते रेंज ऑफीस पर्यंतचा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | रु. ६,१८,०३,०६१/- |
| ८ | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती आय कार्यक्षेत्रातील बंगली हॉस्पीटल ते देवतलाव पर्यतचा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | रु. १,७१,७२,८९०/- |
| ९ | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती आय मधील पारनाका ते किल्लाबंदर जेट्टी पर्यत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | रु.३,६१,४०,७१३/- |
| १० | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'आय' मधील पारनाका ते बेणापट्टी पर्यत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | रु. १,८०,३१,१६३ /- |
| ११ | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'आय' मधील पारनाका ते देवतलाव पर्यत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | रु.३,८६,२९७०३/- |
| १२ | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'आय' मधील दिपमाळ ते पाचुबंदर समुद्र हॉटेल पर्यत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | रु. २,७६,४३,८१५/- |
| १३ | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'आय' मधील प्रांत कार्यालय ते पाचुबंदर हिंदु स्मशानभुमी पर्यत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | रु. ७६,१६,७८८/- |
| १४ | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'डी' मधील नवघर पूर्व स्मशानभुमी ते वसई (पू) रेल्वे स्थानक पर्यत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | रु.२,२६,६५,८३४/- |
| एकुण | | रु.७०,८६,६४,६७३/- |

**वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती ए, डी, ई, जी, एच व आय अंतर्गत विविध रस्ते खडीकरण व डांबरीकरण करणे करणेकामी एकूण रक्कम रुपये ७०,८६,६४,६७३/- इतक्या रक्कमेचे स्वंतत्र प्रभाग निहाय अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.**

**वरील नमुद कामांकरीता होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी घेणे आवश्यक आहे.**

**सदर कामाचा खर्च ''रस्ता बांधकाम'' या लेखाशिर्ष अंतर्गत भागविण्यात येणार आहे.**

**तरी वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती ए, डी, ई, जी, एच व आय अंतर्गत विविध रस्ते खडीकरण व डांबरीकरण करणे कामी होणाऱ्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधि.१९४९ चे कलम ६७(३) (क) अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याचे अधिकार मा. आयुक्त तथा प्रशासक ह्यांना आहेत.**

**तरी सदरचा प्रस्ताव मा. आयुक्त तथा प्रशासक ह्यांच्या मंजूरीस्तव सविनय सादर.**

**निर्णय :-** **वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती ए, डी, ई, जी, एच व आय अंतर्गत खालील नमुद विविध रस्ते खडीकरण व डांबरीकरण करणे कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.**

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती जी मधील बापाणे फाटा ते नायगाव रेल्वे स्थानक (पूर्व) पर्यत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | रु. ११,३२,९९,४१२/- |
| २ | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती जी मधील मधील सातीवली खींड ते रेंज ऑफीस पर्यत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | रु. १३,७३,३१,०४३/- |
| ३ | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती जी मधील मधील रेंज ऑफीस ते गोखीवरे तलाव पर्यतचा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | रु. २,५७,५५,६१६/- |
| ४ | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती डी व एच मधील गोखिवरे तलाव ते माणिकपूर नाक्यापर्यत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | रु. ५,८३,६९,९७२/- |
| ५ | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती एच व आय मधील माणिकपूर नाका ते दत्तानी मॉल पर्यतचा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | रु. १०,३०,००,१४२/- |
| ६ | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती आय कार्यक्षेत्रातील दत्तानी मॉल ते वसई गाव पर्यतचा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | रु. ४,१२,०४,५२१/- |
| ७ | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती जी कार्यक्षेत्रातील वालीव गाव ते रेंज ऑफीस पर्यतचा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | रु. ६,१८,०३,०६१/- |
| ८ | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती आय कार्यक्षेत्रातील बंगली हॉस्पीटल ते देवतलाव पर्यतचा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | रु. १,७१,७२,८९०/- |
| ९ | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती आय मधील पारनाका ते किल्लाबंदर जेट्टी पर्यत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | रु.३,६१,४०,७१३/- |
| १० | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'आय' मधील पारनाका ते बेणापट्टी पर्यत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | रु. १,८०,३१,१६३ /- |
| ११ | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'आय' मधील पारनाका ते देवतलाव पर्यत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | रु.३,८६,२९७०३/- |
| १२ | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'आय' मधील दिपमाळ ते पाचुबंदर समुद्र हॉटेल पर्यत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | रु. २,७६,४३,८१५/- |
| १३ | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'आय' मधील प्रांत कार्यालय ते पाचुबंदर हिंदु स्मशानभुमी पर्यत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | रु. ७६,१६,७८८/- |

| | | |
|---|---|---|
| १४ | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'डी' मधील नवघर पूर्व स्मशानभुमी ते वसई (पू) रेल्वे स्थानक पर्यत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | रु.२,२६,६५,८३४/- |
| | एकुण | रु.७०,८६,६४,६७३/- |

**तसेच वरील नमुद कामाकरीता ई-निविदा कार्यप्रणालीव्दारे प्रभाग निहाय स्वंतत्र बी-१ निविदा दर मागविणे कामी मान्यता देण्यात येत आहे.**

**मनोजकुमार सूर्यवंशी** (भा.प्र.से)
**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**

# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय विरार

**प्रशासकीय ठराव क्र. :-** १३०४ **विभाग :- घनकचरा व्यवस्थापन**

**दिनांक :-** 04/10/2024

**प्रस्तावाचा विषय :-** स्वच्छ भारत अभियान अंतर्गत शहराचे स्वच्छ सर्वेक्षण २०२५, हागणदारी मुक्त शहर अभियान (ODF), कचरामुक्त शहर अभियान (GFC), नमस्ते (NAMASTE) योजना, Smart City Mission अंतर्गत Urban Outcome Framework चे मुल्यांकनाकामी अनुभवी शहर समन्वयक यांना कंत्राटीतत्वावर नेमण्यास व या कामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** स्वच्छ भारत अभियान अंतर्गत गृहनिर्माण आणि शहरी कार्य मंत्रालय केंद्र शासनामार्फत सन २०१६ पासून देशातील शहरांमध्ये स्वच्छ सर्वेक्षण सुरु करण्यात आले. महाराष्ट्र राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी या स्वच्छ सर्वेक्षणात भाग घेतला असून यात वसई विरार शहर महानगरपालिकेचा देखील समावेश आहे.

सन २०१६ च्या स्वच्छ सर्वेक्षणात देशातील १० लक्ष व १० लक्ष पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या ७३ शहरांना नेमण्यात आले होते. तद्नंतर दरवर्षी शहरांच्या संख्येत वाढ होत गेली व त्यासोबत सर्वेक्षणाचे निकष हि कठोर होत गेले. शहरांची प्रगती तपासण्यासाठी व प्रोत्साहन देण्यासाठी स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण, हागणदारी मुक्त शहर अभियान (Open defecation Free - ODF), कचरामुक्त शहर अभियान (Garbage Free City - GFC) व नमस्ते (नॅशनल ॲक्शन फॉर मेकॅनाइज्ड सॅनिटेशन इकोसिस्टम - NAMASTE) योजना, तसेच Smart City Mission अंतर्गत Urban Outcome Framework च्या अनुषंगाने Ease of Living Index (EOI) व Municipal Performance Index (MPI) सर्वेक्षण सुरु करण्यात आले असून महानगरपालिका क्षेत्राचा राहणीमानाचा दर्जाचे मुल्यमापन करुन केंद्र शासनामार्फत निकाल व क्रमांक प्रक्षेपित करण्यांत येत आहेत.

मागील वर्षाची 'स्वच्छ भारत अभियान' व 'City Livability Survey/ Urban Outcome Framework - Smart City Mission' मधील वसई विरार शहर महानगरपालिकेची कामगिरी खालील प्रमाणे आहे.

**तक्ता क्र. १**

| वर्षे | सर्वेक्षण | स्वच्छ भारत अभियान अंतर्गत प्राप्त मानांकन | City Livability Index/ Urban Outcome Framework (Smart City) अंतर्गत प्राप्त मानांकन | शेरा |
|---|---|---|---|---|
| सन २०१६ | २०१६ | देशातील ७३ शहरांमध्ये **३५** वा क्रमांक | - | - |
| सन २०१६-१७ | २०१७ | देशातील ४३४ शहरांमध्ये **१३९** वा क्रमांक | - | - |
| सन २०१७-१८ | २०१८ | देशातील ४२०३ शहरांमध्ये **८१** वा क्रमांक | देशातील ११४ शहरांमध्ये २० वा क्रमांक | शहर समन्वयक कु. दिपाली |

| वर्षे | सर्वेक्षण | स्वच्छ भारत अभियान अंतर्गत प्राप्त मानांकन | City Livability Index/ Urban Outcome Framework (Smart City) अंतर्गत प्राप्त मानांकन | शेरा |
|---|---|---|---|---|
| सन २०१८-१९ | २०१९ | १. देशातील ४२३७ शहरांमध्ये **३६** क्रमांक<br>२. ३ Star GFC मानांकन प्राप्त<br>३. ODF मानांकन प्राप्त | - | वा. पाटलेकर यांची नियुक्ती करण्यांत आली होती. |
| सन २०१९-२० | २०२० | १. स्वच्छ सर्वेक्षण २०२० या श्रेणीत देशातील ४,२४२ शहारांमध्ये **३२** वा क्रमांक<br>२. GFC, १ Star प्राप्त<br>३. ODF मानांकन प्राप्त | सर्वेक्षण २०१९ अंतर्गत:<br>१) EOL: या श्रेणीत देशातील ११४ शहरांमध्ये ३९ वा क्रमांक<br>२) MPI: या श्रेणीत देशातील ११४ शहरांमध्ये ४१ वा क्रमांक | |
| सन २०२०-२१ | २०२१ | १. ODF++ मानांकन प्राप्त<br>२. स्वच्छ सर्वेक्षण २०२१ या श्रेणीत देशातील ४३२० शहरांमध्ये **२९** वा क्रमांक प्राप्त.<br>३. सफाई मित्र सुरक्षा चॅलेंज या श्रेणीत ४५ शहरांमध्ये २३ वा क्रमांक प्राप्त. | - | शहर समन्वयक कु. दिपाली वा. पाटलेकर व कु. हेमाली ज. पाटील यांची नियुक्ती करण्यांत आली होती. |
| सन २०२१-२२ | २०२२ | १. ODF++ मानांकन प्राप्त<br>२. स्वच्छ सर्वेक्षण २०२२ या श्रेणीत देशातील ४३५५ शहरांमध्ये **२५** वा क्रमांक प्राप्त. | - | |
| सन २०२२-२३ | २०२३ | १. स्वच्छ सर्वेक्षण २०२३ या मध्ये देशातील ४३५५+ शहरांचा समावेश, दश लक्ष पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये **३३** वा क्रमांक प्राप्त.<br>२. ODF++ मानांकन प्राप्त. | Urban Outcome Framework २०२२ चे काम पूर्ण झाले असून निकाल बाकी आहे. | |
| सन २०२३-२४, सन २०२४-२५ | २०२४ | १. स्वच्छ सर्वेक्षण २०२४ या मध्ये देशातील ४५८९ शहरांचा समावेश, दश लक्ष पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये **२९ वा** क्रमांक प्राप्त.<br>२. ODF++ मानांकन प्राप्त. | - | |
| सन २०२५-२६ | २०२५ | स्वच्छ सर्वेक्षण २०२५ चे काम सुरु आहे. | - | |

स्वच्छ भारत अभियान- २ अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२५ व स्मार्ट सिटी मिशन अभियान अंतर्गत "Urban Outcome Framework" चे कामकाज उत्कृष्टरित्या विहित कालावधीत पूर्ण करुन राष्ट्रीय पातळीवर उच्चतम क्रमांक मिळवण्याकरिता मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी संदर्भ क्र. २८ प्रशासकिय ठराव क्र. २३५६, दि.२८/०२/२०२५ अन्वये कु. दिपाली वा. पाटलेकर व कु. हेमाली ज. पाटील यांची शहर समन्वयक म्हणून कंत्राटीतत्वावर ६ महिन्याकरिता प्रति माह

रु.५५,०००/- प्रत्येकी ठोक वेतनावर माहे मार्च २०२५ ते ऑगस्ट २०२५ पर्यंत नियुक्ती करण्यात आली होती. त्यांची मुदत दि. ३१/०८/२०२५ रोजी पर्यंत आहे.

स्वच्छ भारत अभियान- २ अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२५, कचरामुक्त शहर (Garbage Free City- 3 Star), हगणदारी मुक्त शहर (Open Defecation Free-ODF++) मानांकनाचे काम तसेच नमस्ते (NAMASTE) योजना राबविणेचे काम सुरु आहे. खालीलप्रमाणे शहर समन्वयक यांच्याकडून काम करुन घेण्यात येत असून पुढील आवश्यक कामे करण्यासाठी त्यांची महानगरपालिकेस आवश्यकता आहे.

- **स्वच्छ भारत अभियान सन २०२५-२०२६ अंतर्गत खालील कामे करावयाची आहेत.**

  १. MIS- केंद्र शासनाच्या माहिती व्यवस्थापन प्रणालीवर मासिक अहवाल अद्यावत करणे व तसेच राज्य शासनास वेळोवळी अहवाल सादर करणे.

  २. ODF++ हागणदारी मुक्त शहराची माहिती, दस्ताऐवज व मुल्यांकन सहामाही अद्यावत करुन केंद्र व राज्य शासनास अहवाल सादर करणे.

  ३. GFC-कचरामुक्त शहराची माहिती, दस्ताऐवज व मुल्यांकन करुन वार्षिक अहवाल सादर करुन केंद्र शासनास सादर करणे.

  ४. SS २०२५ स्वच्छ सर्वेक्षणाची माहिती दस्ताऐवज व मुल्यांकन करुन तीमाही अहवाल तयार करुन केंद्र शासनास सादर करणे.

  ५. स्वच्छ भारत अभियान अंतर्गत विविध उपक्रम राबविणे.

- **स्मार्ट सिटी अंतर्गत Urban Outcomes Framework ची खालील कामे आहेत.**

  १. EOL- शहरातील सुलभ राहणीमान निर्देशांक दस्ताऐवज तयार करणे व मुल्यांकन अहवाल तयार करुन केंद्र शासनाच्या पोर्टलवर अद्यावत करणे.

  २. MPI- महानगरपालिकेची कामगिरी निर्देशांक दस्ताऐवज तयार करणे व मुल्यांकन अहवाल तयार करुन केंद्र शासनाच्या पोर्टलवर अद्यावत करणे.

  ३. Climate Smart Cities Assessment Framework- दिलेल्या मुद्दयानुसारअहवाल तयार करुन केंद्र शासनाच्या पोर्टलवर अद्यावत करणे.

  ४. सदर माहिती महानगरपालिकेतील विविध विभाग तसेच शहरातील विविध शासकिय संस्था व खाजगी संस्था यांच्याशी समन्वय साधुन माहिती संकलीत करावयाची आहे.

- **नॅशनल ॲक्शन फॉर मेकॅनाइज्ड सॅनिटेशन इकोसिस्टम (NAMASTE) योजने अंतर्गत खालील कामे आहेत.**

  १. राज्य व केंद्र शासना कडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या मार्गदर्शक सूचनांनुसार आवश्यक कामांची अंमलबजावणी करुन घेणे.

  २. केंद्र शासनाच्या प्रणालीवर/ अँप द्वारे सफाई कामगार व कचरा वेचक यांचे योजने अंतर्गत प्रोफाईलींग व नोंदणी करून घेणे.

स्वच्छ भारत अभियान-२ अंतर्गत पुढील स्वच्छ सर्वेक्षण २०२५ व स्मार्ट सिटी अंतर्गत Urban Outcomes Framework मुल्यांकनाकामी कु. दिपाली वा. पाटलेकर व कु. हेमाली पाटील यांनी संदर्भ क्र. ३२, दि. ०७/०८/२०२५ व दि. ११/०८/२०२५ रोजीचा अर्ज अन्वये पूढे काम करण्यास इच्छूक असल्याचे कळविले असून त्यांचा शैक्षणिक व अनुभवाचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

तक्ता क्र. २

१. कु. दिपाली वा. पाटलेकर

शैक्षणिक अर्हता :-

| Sr. No. | Name of Degree | University | Passing | % |
|---|---|---|---|---|
| 1. | B.Sc. Zoology | Mumbai | 2012 | 57.87 |
| 2. | M.Sc. Environmental Sciences | Mumbai | 2014 | 67.33 |

अनुभव :-

| Sr. No. | Organization | Post | Period | |
|---|---|---|---|---|
| | | | From | To |
| 1. | i) Klean Environmental Consultant, (HO) Mumbai<br>ii) Klean Laboratories & Research Pvt.Ltd., Tarapur | Environmental Engineer | May 2015 | Sep 2017 |
| 2. | Vasai- Virar City Municipal Corporation | City Co-ordinator (Swachh Bharat Mission & City Livability) | Oct 2017 | Feb 2018 |
| 3. | Vasai- Virar City Municipal Corporation | | Sep 2018 | Aug 2025 |

तक्ता क्र. ३

२. कु. हेमाली ज. पाटील

शैक्षणिक अर्हता :-

| Sr. No. | Name of Degree | University | Passing | % |
|---|---|---|---|---|
| 1. | B.Sc. Zoology | Mumbai | 2016 | 89.38 |
| 2. | M.Sc. Environmental Sciences | Mumbai | 2018 | 70.00 |

अनुभव :-

| Sr. No. | Organization | Post | Period | |
|---|---|---|---|---|
| | | | From | To |
| 1. | NABARD Funded Project | SIS | 2017 | 2018 |
| 2. | Ecotech Pvt. Ltd. , Boisar M.I.D.C. | Internal Auditor | May 2018 | Aug 2018 |
| 3. | Panchgani Hill Station Municipal Council | City Co-ordinator (Swachh Bharat Mission) | Oct 2018 | Apr 2019 |
| 4. | Palghar Municipal Council | | Jul 2019 | Oct 2020 |
| 5. | Vasai- Virar City Municipal Corporation | City Co-ordinator (Swachh Bharat Mission & City Livability) | Oct 2020 | Aug 2025 |

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत तसेच १५ वा वित्त आयोगा अंतर्गत वितरित करण्यात येणारा निधी शहराच्या स्वच्छ सर्वेक्षणात केलेल्या प्रगतीवर व गुणांकनावर अवलंबून आहे. शहर समन्वयक यांनी तक्ता क्र. १ प्रमाणे उत्कृष्ट कामगिरी केली आहे. तसेच स्वच्छ भारत अभियान व स्मार्ट सिटी मिशन अंतर्गत नेमून दिलेल्या कामे व्यतिरिक्त स्वच्छ भारत अभियान अंतर्गत प्राप्त अनुदानाचे विनियोग पाहणे व त्याकरिता प्रस्ताव सादर करणे, शासनाने निर्देशित केलेले विविध घटकांसाठी निधी मागणी करिता 'कृती आराखडा' तयार करणे व केंद्र शासनाच्या स्वच्छतम पोर्टल वर सादर करणे, १५ वा वित्त आयोग अनंतर्गत प्राप्त अनुदान संबंधित माहिती City Finance पोर्टल वर अद्यावत करणे, घनकचरा व्यवस्थापन विभागा संबंधित माहिती PAS पोर्टल, NCAP पोर्टल, MPCB पोर्टल (वार्षिक अहवाल-Form 4, Form 5) व माझी वसुंधरा पोर्टल वर अद्यावत करणे.

तसेच राज्य शासनाद्वारे राबविण्यात येणारे उपक्रम शहरात राबविणे व अहवाल तयार करणे, विभागीय कार्यशाळा, प्रशिक्षण कार्यक्रम आयोजन करणे, टेंडर तयार करणे व अनुषंगिक कामे करणे, NGT-MPCB अनुपालन अहवाल सादर करणे, Creatives Art Work व pamphlets तयार करणे इत्यादी विविध कामे शहर समन्वयक यांच्या मार्फत पार पाडली जात आहेत.

शहर समन्वयक यांची तक्ता क्र. २ व ३ अन्वये शैक्षणिक अर्हता व अनुभव पाहता तसेच तक्ता क्र. १ प्रमाणे केलेली उत्कृष्ट कामगिरी नुसार त्यांना पुढील ६ महिन्यांकरिता प्रत्येकी रु. ५५,०००/- प्रति महिना मानधन देऊन कंत्राटी तत्वावर नेमणूक केल्यास महानगरपालिकेस उपयुक्त मदत होणार आहे. सदरकामी ६ महिन्यांकरिता मानधन/ वेतनावर रु. ६,६०,०००/- इतका खर्च अपेक्षित असून सदर खर्च सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पातील "घनकचरा व्यवस्थापन योजना अंमलबजावणीकामी सल्लागार नेमणुकीसह इतर महसुली खर्च" या लेखाशिर्षा अंतर्गत उपलब्ध तरतुद मधुन भागविणे शक्य आहे.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ नुसार पुढील ६ महिन्यांच्या कालावधीसाठी दि. ०३/०९/२०२५ ते २८/०२/२०२६ पर्यंत कु. दिपाली वा. पाटलेकर व कु. हेमाली ज. पाटील यांची "शहर समन्वयक" म्हणून नेमणूक करण्यास तसेच या कामी येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस पुढील ठराव करण्यात येत आहे.

**ठराव निर्णय :-** १. स्वच्छ भारत अभियान अंतर्गत शहराचे स्वच्छ सर्वेक्षण २०२५, हागणदारी मुक्त शहर अभियान (ODF), कचरामुक्त शहर अभियान (GFC), नमस्ते (NAMASTE) योजना, स्मार्ट सिटी मिशन अभियान अंतर्गत Urban Outcome Framework मुल्यांकनाकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ नुसार कु. दिपाली वामन पाटलेकर व कु. हेमाली जगदिश पाटील यांची नियुक्ती "शहर समन्वयक" म्हणून यापूर्वी करण्यात आली होती. सदर दोन्ही शहर समन्वयकांची मुदत दि. ३१/०८/२०२५ रोजी पर्यंत आहे.

२. वरील प्रमाणे नमुद विविध अभियान व त्यातील घटकांची कामे विहीत कालावधीत पूर्ण करण्याच्या दृष्टीने वरील दोन्ही शहर समन्वयकांची आवश्यकता असल्याचे घनकचरा व्यवस्थापन विभागाने अभिप्राय नोंदविले असून पुढील ६ महिन्यांसाठी नियुक्ती करण्यास विनंती केली आहे.

३. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ नुसार कु. दिपाली वामन पाटलेकर व कु. हेमाली जगदिश पाटील या दोन "शहर समन्वयक" यांना दि. ०१/०९/२०२५ व ०२/०९/२०२५ रोजीचा तांत्रिक सेवाखंड देवून पुढील ६ महिने (०३/०९/२०२५ ते २८/०२/२०२६) या कालावधी करिता कंत्राटी तत्वावर नेमण्यात येत असून दोन्ही शहर समन्वयाकांच्या मानधन/वेतनापोटी येणाऱ्या रु. ६,६०,०००/- खर्चास वित्तिय व प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

मनोजकुमार सुर्यवंशी (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पश्चिम), ता. वसई, जि. पालघर, पिन नं. ४०१३०३.
दुरध्वनी :- ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६ फॅक्स :- ०२५०-२५२५१०७
ई-मेल :- vasaivirarcorporation@yahoo.com

**प्रशासकीय ठराव क्र.** 1305

**विभाग:- घनकचरा व्यवस्थापन**
**दिनांक:-** ०८/ १०/२०२५

**प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात मौजे गोखिवरे येथील क्षेपणभुमीचे सर्वे क्र. ३०अ, ३१ व ३२ या जमिनीचे भुसंपादन मोजणीचे मोजणी फी उप अधिक्षक भुमि अभिलेख, वसई यांना अदा करणेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर:-** वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये उप अधिक्षक भुमि अभिलेख, वसई यांना गाव मौजे गोखिवरे येथील आरक्षण क्र. ५३१-A मधिल स.नं.३०अ, ३१ व ३२ या जागेची मोजणी करणेकामी पत्र देण्यात आलेले होते. त्याअनुषंगाने उप अधिक्षक भुमि अभिलेख, वसई यांनी दि. २८/०८/२०२५ रोजीच्या पत्रान्वये खालीलप्रमाणे भुसंपादन मोजणीचे मोजणी फी भरणेबाबत कळविले आहे.

| अ.क्र | गाव | सर्वे क्र. / गट क्र. | क्षेत्र (हे. आर.) | मोजणी फी |
|---|---|---|---|---|
| १ | गाव मौजे गोखिवरे | ३० अ<br>३१/१<br>३१/२<br>३२ | २५.६७ | ३,३६,००० |
| **एकुण** | | | | **३,३६,०००** |
| **अक्षरी रक्कम रु. तीन लक्ष छत्तीस हजार मात्र.** | | | | |

उपरोक्त तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे उप अधिक्षक भुमि अभिलेख, वसई यांना अदा करणेत येणारी **रु. ३,३६,०००/- (अक्षरी तीन लक्ष छत्तीस हजार मात्र)** रक्कमेचे मोजणी फी मालमत्ता व्यवस्थापन विभाग (मालमत्ता व मिळकत सर्व्हेक्षण करणे) लेखासांकेतांक ७७-२२९० या लेखाशिर्षामधून भागविणे शक्य होईल. याकामी उप अधिक्षक भुमि अभिलेख, वसई यांना मोजणी फी अदा करणेकामी घनकचरा व्यवस्थापन विभागाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी, उप अधिक्षक भुमि अभिलेख, वसई यांना मोजणी फी अदा करणेकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी पुढील प्रमाणे ठराव करण्यात येत आहे.

**प्रस्तावाचा निर्णय :-** वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात मौजे गोखिवरे येथील क्षेपणभुमीचे सर्वे क्र. ३०अ, ३१ व ३२ या जमिनीचे भुसंपादन मोजणीचे मोजणी फी उप अधिक्षक भुमि अभिलेख, वसई यांना अदा करणेकामी होणाऱ्या **रक्कम रु. ३,३६,०००/- (रक्कम रु. तीन लक्ष छत्तीस हजार मात्र)** इतका खर्च मालमत्ता व्यवस्थापन विभाग (मालमत्ता व मिळकत सर्व्हेक्षण करणे) लेखासांकेतांक ७७-२२९० या लेखाशिर्षामधून भागविणेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

**मनोजकुमार सुर्यवंशी** (भाप्रसे)
**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

**वसई-विरार शहर महानगरपालिका**
मुख्य कार्यालय, विरार (पू)., ता.वसई, जि.पालघर, पिन – ४०१ ३०३.
दूरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/२०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७
ई मेल – vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. १३०६

विभाग – विधी
दि. ०८/१०/२०२५

**प्रस्तावाचा विषय:-** वसई विरार शहर महानगरपालिकेच्या विधी पॅनलवर तीन वर्षांकरिता अतिरिक्त विधीज्ञ व वरिष्ठ विधिज्ञ यांची नेमणूक करणे बाबत.

**प्रस्तावाचा मजकूर:-** सविनय सादर करण्यात येते की, मा. उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल रिट याचिका (स्टॅम्प) क्र. ३२४२/२०२५ मध्ये मा. आयुक्त महोदय यांनी महानगरपालिकेच्या विधी पॅनलवर मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालय करीता वकीलांचे पॅनल तयार करण्यासाठी जाहिरात प्रसिद्ध करणे बाबत निर्देश दिलेले आहेत.

सद्यस्थितीत महानगरपालिकेच्या विधी पॅनलवर खालीलप्रमाणे विधीज्ञांची नियुक्ती केलेली आहे.

| अ.क्र. | न्यायालयाचे नाव | संख्या |
|---|---|---|
| १. | मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली (Supreme Court, Delhi) | ०२ |
| २. | मा. उच्च न्यायालय, मुंबई (High Court, Bombay) (सिनियर काऊन्सिल) | ०१ |
| ३. | मा. उच्च न्यायालय, मुंबई (High Court, Bombay) | ०७ |
| ४. | मा. दिवाणी व फौजदारी न्यायालय, वसई (Civil & Criminal Court, Vasai) | ०५ |
| ५. | मा. कामगार व औद्योगिक न्यायालय (Labour & Industrial Court) | ०१ |
| ६. | मा. मानवी हक्क आयोग (Human Rights Commission) | ०४ |
| ७. | मा. झोपडपट्टी न्यायाधिकरण (Slum Tribunal) | ०१ |
| ८. | मा. ग्राहक विवाद निवारण आयोग (Consumer Dispute Redressal Commission) | ०१ |
| ९. | मा. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण (National Green Tribunal) | ०३ |
| १०. | मा. राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण (National Company Law Tribunal) | ०२ |
| ११. | मा. मोटर अपघात दावा न्यायाधिकरण (Motor Accident Claim Tribunal) | ०१ |
| १२. | मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण (Maharashtra Administrative Tribunal) | ०१ |

उक्त प्रकरणी मा. आयुक्त महोदय यांचे दालनात दि. २४/०९/२०२५ रोजी सहा. आयुक्त (विधी), विधी सल्लागार यांनी मा. आयुक्त महोदय यांचे समवेत चर्चा केली. त्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या विरोधात वाढती

न्यायालयीन प्रकरणे विचारात घेता विविध न्यायालय/न्यायाधिकरण निहाय अतिरिक्त विधीज्ञ व वरिष्ठ विधिज्ञ नेमणूक करणे बाबतचे निर्देश मा. आयुक्त महोदय यांनी दिले. सद्यस्थितीमध्ये प्रलंबित असलेली न्यायप्रविष्ठ प्रकरणे विचारात घेता महानगरपालिकेच्या विधी पॅनलवर खालील प्रमाणे न्यायालयीन निहाय अतिरिक्त विधीज्ञ व वरिष्ठ विधिज्ञांची आवश्यकता वाटत आहे.

| अ.क्र. | न्यायालयाचे नाव |
|---|---|
| १. | मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली (Supreme Court, Delhi) |
| २. | मा. उच्च न्यायालय, मुंबई (High Court, Bombay) (सिनियर काऊन्सिल) |
| ३. | मा. उच्च न्यायालय, मुंबई (High Court, Bombay) |
| ४. | मा. दिवाणी व फौजदारी न्यायालय, वसई (Civil & Criminal Court, Vasai) |
| ५. | मा. कामगार व औद्योगिक न्यायालय (Labour & Industrial Court) |
| ६. | मा. मानवी हक्क आयोग (Human Rights Commission) |
| ७. | मा. झोपडपट्टी न्यायाधिकरण (Slum Tribunal) |
| ८. | मा. ग्राहक विवाद निवारण आयोग (Consumer Dispute Redressal Commission) |
| ९. | मा. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण (National Green Tribunal) |
| १०. | मा. राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण (National Company Law Tribunal) |
| ११. | मा. मोटर अपघात दावा न्यायाधिकरण (Motor Accident Claim Tribunal) |
| १२. | मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण (Maharashtra Administrative Tribunal) |

महानगरपालिकेच्या विधी पॅनलवर नेमणूक करण्यात येणाऱ्या अतिरिक्त विधीज्ञ व वरिष्ठ विधिज्ञ यांचे व्यावसायिक शुल्क हे देण्यासाठी होणारा खर्च अर्थसंकल्पातील 'दावे आणि खटले फी' या लेखाशिर्षकातून भागविण्यात येईल.

उपरोक्तप्रमाणे महानगरपालिकेच्या विधी पॅनलवर न्यायालय निहाय अतिरिक्त विधीज्ञ व वरिष्ठ विधिज्ञ यांची सन २०२५ पासून ते २०२८ पर्यंत तीन वर्षांकरिता नव्याने नेमणूक करणे याबाबतची जाहीर सूचना वृत्तपत्रात, महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्धी देणे तसेच मंजूर दरापत्रकानुसार त्यांचे देयक अदा करणे व त्या कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता कामी मंजुरीस्तव सदरचा प्रस्ताव सविनय सादर.

..............................................................................................................................................................................................

**ठराव:**- महानगरपालिकेच्या विधी पॅनलवर न्यायालय निहाय अतिरिक्त विधीज्ञ व वरिष्ठ विधिज्ञ यांची सन २०२५ पासून ते २०२८ पर्यंत तीन वर्षांकरिता नव्याने नेमणूक करणे याबाबतची जाहीर सूचना वृत्तपत्रात, महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्धी देणे तसेच मंजूर दरापत्रकानुसार त्यांचे देयक अदा करणे व त्या कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

मनोजकुमार सूर्यवंशी (भा.प्र.से)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

**वसई विरार शहर महानगरपालिका**
मुख्य कार्यालय, विरार

**प्रशासकिय ठराव क्र.** १३०८

**विभाग :- आस्थापना**
**दिनांक :-** ०८/१०/**२०२५**

---

**विषय :-** वसई - विरार शहर महानगपालिका आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना दिपावली २०२५ करिता सानुग्रह अनुदान अदा करणेस प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचे कडील अधिसुचना क्र.संकिर्ण - २३०६/४१२/ प्र.क्र.२२३/२००९ दिनांक ०३/०७/२००९ अन्वये वसई विरार शहर महानगरपालिकेची स्थापना झालेली असुन ती (क) वर्गात मोडत आहे. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर तत्कालीन न गरपारिषदेतील ८०७ व तत्कालीन ग्रामपंचायती मधील ४०८ अशा एकुण १२१५ कर्मचाऱ्यांची आस्थापना आहे. तसेच महानगरपालिकेचा सुधारीत आकृतीबंध दि.९/९/२०१४ रोजी मंजूर झाला. त्यात २८५२ पदांना मंजूरी देण्यात आलेली आहे. सदर मंजूर पदांपैकी आस्थापनेवर कार्यरत कर्मचारी, २५६ ई फॉर्म रोजंदारी वरील कर्मचारी, NULM विभागातील कर्मचारी, क्षयरोग नियंत्रण विभागातील कर्मचारी, NUHM अंतर्गत कार्यरत कर्मचारी, कंत्राटी ६ महीने तत्वावर कार्यरत कर्मचारी, कोव्हिड-१९ अंतर्गत नियुक्त कर्मचारी, अर्चना सर्विसेस कंत्राटी कर्मचारी ठेका अंतर्गत कार्यरत कर्मचारी यांना मागील ५ वर्षात सानुग्रह अनुदानापोटी दिपावली सणानिमित्त खालीलप्रमाणे सानुग्रह अनुदान अदा करणेत आलेले आहे.

**प्रपत्र — अ**

| सन | कर्मचारी संख्या | प्रत्यक्ष कामाचे दिवस | प्रती दिन रु. | सानुग्रह अनुदान प्रती कर्मचारी रु. |
|---|---|---|---|---|
| २०२० | २८०६ | २६५ | ४६ | १२१९०/- |
| २०२१ | ३३०० | २४२ | ५०.३७ | १२१९० /- |
| २०२२ | ३४२८ | २४१ | ५०.५८ | १२१९० /- |
| २०२३ | ३४८८ | २४५ | ६१.२२५ | १५००० /- |
| २०२४ | ३३२५ | २३७ | ८४.३८७ | २०००० /- |

**तसेच इतर महानगरपालिका कार्यालयाद्वारे कर्मचाऱ्यांना दरवर्षी सानुग्रह अनुदान मंजूर करणेत येतो, (सोबत नवी मुंबई महानगरपालिका व ठाणे महानगरपालिका येथील सानुग्रह अनुदान मंजूरी आदेश जोडले आहेत.)**

उपरोक्त कर्मचाऱ्यांना दिपावली सन २०२४ मध्ये सानुग्रह अनुदान अदा करणे करिता एकूण रु. ४,२३,६६,०००/- इतका खर्च झाला होता.

'सफाई कामगार' यांचे कंत्राटी पध्दतीवर कंत्राटदार नेमणे तसेच त्यांचे वेतन अदा करणे हे सर्व कामकाज सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत स्वतंत्ररीत्या केले जाते. तसेच महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ अंतर्गत कार्यरत कर्मचारी यांना म.रा.सु.महामंडळातर्फे, सुरक्षा रक्षक मंडळ, बृह्नमुंबई, ठाणे जिल्हा अंतर्गत कर्मचाऱ्यांना सुरक्षा रक्षक मंडळातर्फे बोनस अदा केला जातो. व सैनिक इंटेलिजेंस अँण्ड सिक्युरीटी

प्रा.लि. यांचे मंजुर दरात समाविष्ट असल्याने त्यांना सैनिक इंटेलिजेंस ॲण्ड सिक्युरीटी प्रा.लि. यांचेमार्फत बोनस अदा केला जातो. त्यामुळे सदर कर्मचाऱ्यांना आस्थापना विभागामार्फत सानुग्रह अनुदान अदा केले जात नाही.

कंत्राटी तत्वावर कार्यरत कर्मचाऱ्यांचे वेतनातून दरमहा बोनसपोटी कपात केलेली रक्कम ठेकेदारास दिली जात नाही. करीता सदर कंत्राटी तत्वावर कार्यरत कर्मचाऱ्यांनासुध्दा आस्थापनेमार्फत सानुग्रह अनुदान अदा करणेत येतो.

सन २०२३-२४ मध्ये प्रत्यक्ष कामकाजाचे दिवस २३७ असल्याने कर्मचाऱ्यांना २३७ दिवस विचारात घेऊन सन २०२४-२५ दिपावली सणाकरीता रु.८४.३८७/- प्रतिदिनप्रमाणे किंवा प्रति कर्मचारी रु.२०,०००/- या दराने सानुग्रह अनुदान अदा करणेत आले होते. **तथापी सन २०२४-२५ या वित्तीय वर्षात प्रत्यक्ष कामाचे दिवस २४१ आहेत.**

सन २०२४-२५ या वित्तीय वर्षात प्रति कर्मचारी रु.२०,०००/- प्रमाणे सानुग्रह अनुदान अदा करणेत आलेला आहे. मागील काही वर्षात जागतिक स्तरावर कोरोनाचा प्रादुर्भाव झाल्याने अनुदानाचे दर वाढविण्यात आले नव्हते. परंतु मागील दोन वर्षात महापालिकेच्या करवसुलीत चांगल्याप्रकारे वाढ झालेली आहे.

मा. श्री. महाबल शेट्टी, निमंत्रक महाराष्ट्र राज्य महानगरपालिका कर्मचारी संघटना व इतर यांच्या मागण्यांबाबत मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दि. ३१/१०/२००२ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त नगरविकास विभागाकडील पत्र क्र. जीईएन १०९७/प्र.क्र. २६७/नवि-२४, दि.१७/११/२००२ च्या पत्रासोबत जोडलेले आहे. सदर इतिवृत्तातील मुद्दा क्र.१ बाबत शासनाने घेतलेला निर्णय खालीलप्रमाणे आहे.

**बोनस ॲक्टनुसार महापालिकेचे कर्मचारी बोनस मिळण्यास पात्र नाहीत, त्यामुळे त्यांना बोनस देणे शक्य नाही. महानगरपालिकेने सानुग्रह अनुदान देण्यासंदर्भात आपल्या आर्थिक परिस्थितीचा विचार करुन सानुग्रह अनुदान किती द्यावे याबाबतचा निर्णय आपल्या स्तरावर घ्यावा. राज्य शासन महापालिकेला कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी कुठल्याही प्रकारचे अनुदान देत नसल्यामुळे सानुग्रह अनुदान देण्याबाबत निर्णय घेण्यासाठी महानगरपालिकेने राज्य शासनाची पुर्व परवानगी घेण्याची गरज नाही. सानुग्रह अनुदान देताना प्रशासन आणि महासभा यांच्यामध्ये वाद निर्माण झाल्यास व त्यानंतर हा वाद शासनाकडे निर्णयासाठी पाठवला गेल्यास शासन अशाप्रकारे उचित निर्णय घेईल.**

तरी मागील दोन वर्षात महापालिकेच्या करवसुलीत चांगल्याप्रकारे वाढ झालेली आहे. तसेच वाढत्या महागाईचा विचार करुन व कर्मचाऱ्यांची मागणी विचारात घेऊन दिपावली सन २०२५ करीता कर्मचाऱ्यांना मागील वर्षापेक्षा अधीक यानुसार सानुग्रह अनुदान रु.२५,०००/- याप्रमाणे मंजुर झाल्यास खालीलप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

**प्रपत्र - ब**

| अ.क्र. | कर्मचारी तपशिल | कर्मचारी संख्या | सानुग्रह अनुदान प्रति कर्मचारी (रु.) | एकूण खर्च (रु.) |
|---|---|---|---|---|
| १ | स्थायी आस्थापना | ९६२ | २५००० | २४०५०००० |
| २ | २५६-ई फॉर्म रोजंदारी | १० | २५००० | २५०००० |
| ३ | NULM | ६ | २५००० | १५०००० |
| ४ | स्वच्छ भारत अभियान विभाग | २ | २५००० | ५०००० |
| ६ | क्षयरोग नियंत्रण | ३० | २५००० | ७५०००० |
| ७ | NUHM | १४९ | २५००० | ३७२५००० |
| ८ | कंत्राटी (६म) | ३९६ | २५००० | ९९००००० |
| ९ | कोव्हिड-१९ कर्मचारी | २२२ | २५००० | ५५५०००० |
| १० | अर्चना सर्विसेस कंत्राटी कर्मचारी ठेका | १५९२ | २५००० | ३९८००००० |
| ११ | आर. जी. कन्स्ट्रकशन | २७१ | २५००० | ६७७५००० |
| | | ३६४० | | ९१०००००० |

कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान अदा करताना प्रत्यक्ष कामकाज केलेल्या दिवसाच्या गणनेनुसार अदा करणेत येते, त्यामुळे प्रपत्र-ब मध्ये दर्शविण्यात आलेली अपेक्षीत खर्चाची रक्कम हि अंदाजित आहे. **तथापी मागील सन २०२४-२५ मध्ये एकूण संभाव्य खर्चाच्या तुलनेत मात्र ६५.८२% खर्च झाला होता. त्या अनुषंगाने सन २०२५ मधील संभाव्य खर्च ९,०९,५०,०००/- च्या ७५% खर्च होण्याची शक्यता धरून एकूण रु.६,८२,५०,०००/- इतका खर्च होणे अपेक्षित आहे.** महानगरपालिकेने सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाकरीता महानगरपालिका आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांकरीता **"महानगरपालिका कर्मचारी वर्गास बक्षिस/ सानुग्रह अनुदान (बोनस)" या लेखाशिर्षाखाली रक्कम रु.५,००,००,०००/- व 'पाणीपुरवठा कर्मचारी सानुग्रह अनुदान' या लेखाशिर्षाखाली रक्कम रु.७०,००,०००/- ची तरतुद केली आहे.** करिता, सन २०२५-२६ या वित्तीय वर्षातील तरतूद पाहता कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान अदा करणेस अधिक खर्च होत असल्यास त्याकरीता सन २०२५-२६ मधील चार महिन्यांच्या सुधारित अर्थसंकल्पात वाढीव तरतुद करणेत येईल.

सबब सन २०२४-२५ मध्ये कर्मचाऱ्यांना एका वर्षामध्ये सहा महिन्यापासून पुर्ण वर्षापर्यंत सलग सेवेच्या कालावधीसाठी यथाप्रमाणे बोनसची रक्कम अनुज्ञेय असेल. कर्मचाऱ्यांना सन २०२४-२५ ह्या वित्तलब्धीवर दिपावली सन २०२५ करीता महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी, प्रतिनियुक्ती वरील अधिकारी/कर्मचारी, NULM अंतर्गत प्रकल्प अधिकारी व समुह संघटक, पेल्हार धरण योजनेवरील २५६ ई फॉर्मवरील व रोजंदारी कर्मचारी, सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत महानगरपालिका हद्दीत कार्यरत कर्मचारी, NUHM अंतर्गत कार्यरत कर्मचारी, स्वच्छ भारत अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी, वैद्यकिय विभागातील ६ महिने कंत्राटी तत्वावर कार्यरत कर्मचारी, कोव्हिड-१९ अंतर्गत कार्यरत

कर्मचारी, अर्चना सर्विसेस अंतर्गत आस्थापना मार्फत घेतलेले कंत्राटी पध्दतीने कार्यरत कर्मचारी व आर. जी. कन्स्ट्रकशन अंतर्गत पाणीपुरवठा विभागा मार्फत कार्यरत कंत्राटी कर्मचारी अशा एकूण ३६४० कर्मचाऱ्यांना दिपावली सन २०२५ करीता सुध्दा सानुग्रह अनुदान अदा करणेस प्रशासकिय व वित्तीय मंजुरीकरीता सादर करणेत आला होता.

त्यानुसार खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**ठराव/ निर्णय** :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना सन २०२३-२४ रोजी महानगरपालिका आस्थापनेवर किमान ६ महिन्यांचा कार्यकाल पुर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना दिपावली सन २०२४ करीता प्रत्यक्ष कामकाजाचे २३७ दिवस विचारात घेऊन प्रतिदिन रु.८४.३८७/- किंवा प्रति कर्मचारी रु.२००००/- यापैकी जी रक्कम कमी असेल तितकी रक्कम सानुग्रह अनुदानापोटी अदा करण्यांत आली होती.

सन २०२४-२५ मध्ये प्रत्यक्ष कामकाजाचे दिवस २४१ आहेत. त्यानुसार सन २०२४-२५ मध्ये कर्मचाऱ्यांना एका वर्षामध्ये सहा महिन्यापासून पुर्ण वर्षापर्यंत सलग सेवेच्या कालावधीसाठी यथाप्रमाणे सानुग्रह अनुदान अनुज्ञेय असेल. कर्मचाऱ्यांना सन २०२४-२५ ह्या वित्तलब्धीवर दिपावली सन २०२५ करीता महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी, प्रतिनियुक्ती वरील अधिकारी/कर्मचारी, NULM अंतर्गत प्रकल्प अधिकारी व समुह संघटक, पेल्हार धरण योजनेवरील २५६ ई फॉर्मवरील व रोजंदारी कर्मचारी, सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत महानगरपालिका हद्दीत कार्यरत कर्मचारी, NUHM अंतर्गत कार्यरत कर्मचारी, स्वच्छ भारत अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी, वैद्यकिय विभागातील ६ महिने कंत्राटी तत्वावर कार्यरत कर्मचारी, कोव्हिड-१९ अंतर्गत कार्यरत कर्मचारी, अर्चना सर्विसेस अंतर्गत आस्थापना मार्फत घेतलेले कंत्राटी पध्दतीने कार्यरत कर्मचारी व आर. जी. कन्स्ट्रकशन अंतर्गत पाणीपुरवठा विभागा मार्फत कार्यरत कंत्राटी कर्मचारी अशा एकूण ३६४० कर्मचाऱ्यांना दिपावली सन २०२५ करीता सन २०२४-२५ मधील प्रत्यक्ष कामाकाजाचे २४१ दिवस विचारात घेऊन प्रतिदिन रु. ९१.२८६ किंवा प्रति कर्मचारी रु. २२,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल तितकी रक्कम सानुग्रह अनुदानापोटी अदा करणेस प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. प्रती कर्मचारी रु. २२,०००/- याप्रमाणे उपरोक्तनुसार नमुद एकूण ३६४० कर्मचाऱ्यांकरीता रक्कम रु.८,००,८०,०००/- इतका खर्च होणे अपेक्षीत आहे.

सबब सन २०२५ चे दिवाळी सणानिमीत्त द्यावयाचे सानुग्रह अनुदानापोटी होणाऱ्या खर्चास वित्तीय व प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

मनोजकुमार सुर्यवंशी (भा. प्र. से,)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

\\DESKTOP-AU31A9C\Astha\Bhakti kini\salary\sahanaugrah Anudan Letter1.doc

P/55


# वसई विरार शहर महानगपालिका

मुख्य कार्यालय, यशवंत नगर, विरार (प) जि. पालघर, पिन नं. ४०१३०५

दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७

ई-मेल - vasaivirarcorporation@yahoo.com


प्रशासकिय ठराव क्रं. 1306

विभाग :- बाजार विभाग

दिनांक :- 06/10/2025

**प्रस्तावाचा विषय** : दि.०१/१०/२०२५ ते दि.३०/०९/२०२८ (३६ महिने) या तीन वर्षे कालावधी करीता वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील दैनंदिन व आठवडे बाजार कर वसुलीची ई-बोली निविदा व जाहिर नोटीस प्रसिध्दी करीता प्रशासकिय व वित्तिय मंजुरी मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकुर** : वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात "अे ते आय" अशा एकुण नऊ प्रभाग समिती असून प्रत्येक प्रभाग समिती मध्ये (डी वगळून) दैनंदिन व आठवडे बाजार भरत असतात. त्या दैनंदिन व आठवडे बाजाराचे प्रभाग समिती मार्फत स्वतंत्र ठेका निविदा काढून बाजार कर वसुली करीता ठेकेदार नियुक्त केला जातो. प्रभाग समिती अे ते आय" (डी वगळून) मधिल बाजार कर वसूली ठेका बाबत बाजारांची नावे खालीलप्रमाणे.

| अ.क्र | प्रभाग सामितीचे नाव | बाजाराचे नाव | बाजाराची संख्या |
|---|---|---|---|
| १ | ए, बोळीज | बोळींज बाजार | १ |
| २ | बी, नालासोपारा पूर्व | तुळींज बाजार | १ |
| ३ | सी, चंदनसार | विरार पूर्व | १ |
| ४ | ई- नालासोपारा (प) | आचोळे बाजार | १ |
| | | निळेमोरे बाजार | १ |
| ५ | एफ -धानिव पेल्हार | बिलालपाडा, धानिव, गावराई पाडा, शिरसाड बाजार | १ |
| | | मांडवी | १ |
| ६ | जी – वालिव | वालिव बाजार | १ |
| | | गोखिवरे | १ |
| | | सातिवली | १ |
| | | जुचंद्र | १ |
| | | कामण | १ |
| | | कोल्ही/ चिंचोटी | १ |
| ७ | एच- नवघर माणिकपूर | प्रभाग समिती क्षेत्र | १ |
| ८ | आय – वसई | पापडी आठवडे व दैनंदिन बाजार | १ |
| | | चिमाजी आप्पा मैदान खाऊ गल्ली | १ |
| | | कोळीवाडा बाजार | १ |
| | | गोळवाडा बाजार | १ |
| | | ताम तलाव बाजार | १ |
| | | उमेळा बाजार | १ |
| | | नायगाव बाजार | १ |
| | | होळी मासळी बाजार | १ |
| | | होळी भाजी बाजार | १ |
| | | आय अस्मिता व सुरुची बाग बाजार | १ |
| | | वडवली मार्केट | १ |
| | | | १ |
| | | एकुण | २५ |

वरीलप्रमाणे प्रत्येक प्रभाग समिती मध्ये (डी वगळून) स्वतंत्र बाजार वसुली करीता ठेका नियुक्त करण्यात येतो. व त्यानुसार प्रभाग समिती अे ते आय (डी वगळून) आजमितीस बाजार कराची वसुली करण्यात येत आहे. या अगोदर प्रभाग समिती अे ते आय (डी वगळून) बाजारांचे वेगवेगळे ठेकेदार नियुक्त होऊन स्वतंत्र करारनामे

करुन कार्यादेश देण्यात येत होते. त्यामध्ये दरवर्षी १०% वाढ प्रमाणे निविदा काढून ठेका नियुक्त करीत असल्याने काही बाजारात पुरेशा प्रमाणात फेरीवाल्यांची संख्या या मध्ये वाढ होत नसल्याने अशा बाजारांचे ठेकेदार मुदतपूर्ण होऊनही ठेक्याची रक्कम थकीत ठेऊन महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान करीत होते. त्यामुळे अशा ठेकेदारांवर कारवाई करुन वसूली करणेकरीता अधिकारी/कर्मचारी यांचा बराचसा वेळ वाया जात असतो. ज्या बाजारांच्या निविदेस ठेकेदार सहभागी होत नाहीत अशा नुकसानीचे बाजार प्रभाग समितीच्या इतर उत्पन्नाच्या बाजाराशी इगतवारी करुन बाजार निविदा प्रक्रीया केल्यास महानगरपालिकेस तसेच नियुक्त ठेकेदारास आर्थिक नुकसान होण्याची शक्यता कमी होऊन सर्व बाजार वसुली ठेका निविदेस जाऊन महानगरपालिकेचे उत्पन्नात वाढ होऊन ठेकेदाराकडून बाजार कर वसूली करणे सोईचे होईल. प्रभाग समिती अे ते आय (डी वगळून) बाजारांची ३ निविदा काढून त्या ३ निविदेकरीता प्रभाग समिती अे ते आय (डी वगळून) मधिल केलेल्या वार्षिक रक्कमेचा इगतवारीचा तक्ता खालीलप्रमाणे.

| अ. क्र | प्रभाग समिती चे नाव | फेरीवाले संख्या | फेरीवाला सर्वेक्षण नुसार एक दिवसाची रक्कम | एकुण महिन्याची रक्कम | एकुण वार्षिक रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग समिती अे, बोळींज | ८९७ | ३५२७२ | १०५८१६० | १२६९७९२० |
| २ | प्रभाग समिती बी, नालासोपारा (पू) | १३७२ | ३६७९९ | ११०३९७० | १३२४७६४० |
| ३ | प्रभाग समिती सी, चंदनसार | ११९५ | ३९१५५ | ११७४६५० | १४०९५८०० |
| ४ | प्रभाग समिती ई, नालासोपारा (प) | १२९४ | ५१०६८ | १५३२०४० | १८३८४४८० |
| ५ | प्रभाग समिती एफ, धानिव/पेल्हार | ११०० | ३६२४४ | १०८७३२० | १३०४७८४० |
| ६ | प्रभाग समिती जी, वालीव | १६६० | ७३४१५ | २२०२४५० | २६४२९४०० |
| ७ | प्रभाग समिती एच, नवघर | ६३२ | ३६४२७ | १०९२८१० | १३११३७२० |
| ८ | प्रभाग समिती आय, वसई | ९२२ | ३१०८५ | ९३२५५० | १११९०६०० |
| एकुण | | ९०७२ | ३३९४६५ | १०१८३९५० | १२२२०७४०० |

वरील तक्त्याप्रमाणे फेरीवाल्यांच्या संख्येनुसार वाढीव मंजुर दराप्रमाणे एक दिवसाची रक्कम व महिन्याची रक्कम तसेच वार्षिक रक्कम काढून एकत्रित वार्षिक रक्कम तयार करण्यात आलेली आहे. त्यानुसार तीन निविदा काढणेकामी १) प्रभाग समिती अे व सी २) प्रभाग समिती बी, ई, एच ३) प्रभाग समिती एफ.जी.आय यांचे एकत्रिकरण करुन वार्षिक रक्कमेनुसार पुढील दोन वर्षात १०% वाढ करुन आठवडे व दैनिक बाजाराच्या लिलावाची ई-बोली पद्धतीने होणाऱ्या निविदा रक्कमेचा तपशिल खालीलप्रमाणे.

निविदा क्र. १
प्रभाग समिती अे व प्रभाग समिती सी

| अ. क्र | बाजाराचे नाव | फेरीवाले सर्वेक्षण नुसार एक वर्षासाठी रक्कम (१ ऑक्टोबर २०२५ ते ३० सप्टेंबर २०२६) | दि. १ ऑक्टोबर २०२६ ते ३० सप्टेंबर २०२७ (१०% वाढ) | आधारभूत किंमत (दि. १ ऑक्टोबर २०२६ ते ३० सप्टेंबर २०२७) | दि.०१ ऑक्टोबर २०२७ ते दि. ३० सप्टेंबर २०२८ (१०% वाढ) | आधारभूत किंमत (दि. ०१ ऑक्टोबर २०२७ ते दि. ३० सप्टेंबर २०२८) | दि. ०१ ऑक्टोबर २०२५ ते दि. ३० सप्टेंबर २०२८ आधारभुत रक्कम (३ वर्ष) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | बोळींज बाजार अे | १२६९७९२० | १२६९७९२ | १३९६७७१२ | १३९६७७१ | १५३६४४८३ | ४२०३०११५ |
| २ | चंदनसार बाजार | १४०९५८०० | १४०९५८० | १५५०५३८० | १५५०५३८ | १७०५५९१८ | ४६६५७०९८ |
| | एकुण | २६७९३७२० | २६७९३७२ | २९४७३०९२ | २९४७३०९ | ३२४२०४०१ | ८८६८७२१३ |

निविदा क्र. २

प्रभाग समिती बी, प्रभाग समिती ई व प्रभाग समिती एच

| अ. क्र | बाजाराचे नाव | फेरीवाले सर्वेक्षण नुसार एक वर्षासाठी रक्कम (१ ऑक्टोबर २०२५ ते ३० सप्टेंबर २०२६) | दि. १ ऑक्टोबर २०२६ ते ३० सप्टेंबर २०२७ (१०% वाढ) | आधारभूत किंमत (दि. १ ऑक्टोबर २०२६ ते ३० सप्टेंबर २०२७) | दि.०१ ऑक्टोबर २०२७ ते दि. ३० सप्टेंबर २०२८ (१०% वाढ) | आधारभूत किंमत (दि. ०१ ऑक्टोबर २०२७ ते दि. ३० सप्टेंबर २०२८) | दि. ०१ ऑक्टोबर २०२५ ते दि. ३० सप्टेंबर २०२८ आधारभुत रक्कम (३ वर्ष) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग समिती बी | १३२४७६४० | १३२४७६४ | १४५७२४०४ | १४५७२४० | १६०२९६४४ | ४३८४९६८८ |
| २ | प्रभाग समिती ई | १८३८४४८० | १८३८४४८ | २०२२२९२८ | २०२२२९३ | २२२४५२२१ | ६०८५२६२९ |
| ३ | प्रभाग समिती एच | १३११३७२० | १३११३७२ | १४४२५०९२ | १४४२५०९ | १५८६७६०१ | ४३४०६४१३ |
| | एकुण | ४४७४५८४० | ४४७४५८४ | ४९२२०४२४ | ४९२२०४२ | ५४१४२४६६ | १४८१०८७३० |

निविदा क्र. ३

प्रभाग समिती प्रभाग एफ. प्रभाग समिती जी व प्रभाग समिती आय

| अ. क्र | बाजाराचे नाव | फेरीवाले सर्वेक्षण नुसार एक वर्षासाठी रक्कम (१ ऑक्टोबर २०२५ ते ३० सप्टेंबर २०२६) | दि. १ ऑक्टोबर २०२६ ते ३० सप्टेंबर २०२७ (१०% वाढ) | आधारभूत किंमत (दि. १ ऑक्टोबर २०२६ ते ३० सप्टेंबर २०२७) | दि.०१ ऑक्टोबर २०२७ ते दि. ३० सप्टेंबर २०२८ (१०% वाढ) | आधारभूत किंमत (दि. ०१ ऑक्टोबर २०२७ ते दि. ३० सप्टेंबर २०२८) | दि. ०१ ऑक्टोबर २०२५ ते दि. ३० सप्टेंबर २०२८ आधारभुत रक्कम (३ वर्ष) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग समिती एफ | १३०४७८४० | १३०४७८४ | १४३५२६२४ | १४३५२६२ | १५७८७८८६ | ४३१८८३५० |
| २ | प्रभाग समिती जी | २६४२९४०० | २६४२९४० | २९०७२३४० | २९०७२३४ | ३१९७९५७४ | ८७४८१३१४ |
| ३ | प्रभाग समिती आय | १११९०६०० | १११९०६० | १२३०९६६० | १२३०९६६ | १३५४०६२६ | ३७०४०८८६ |
| | एकुण | ५०६६७८४० | ५०६६७८४ | ५५७३४६२४ | ५५७३४६२ | ६१३०८०८६ | १६७७१०५५० |

वरील प्रमाणे निविदा तक्ता क्र. १ प्रभाग समिती अे व प्रभाग समिती सी यांची ३ वर्षाकरीता निविदेची रक्कम रु.८८६८७२१३/-होत आहे. निविदा तक्ता क्र. २ प्रभाग समिती बी, प्रभाग समिती ई व प्रभाग समिती एच यांची ३ वर्षाकरीता निविदेची रक्कम रु.१४८१०८७३०/- व निविदा तक्ता क्र. ३ प्रभाग समिती प्रभाग एफ. प्रभाग समिती जी व प्रभाग समिती आय यांची ३ वर्षाकरीता निविदेची रक्कम रु. १६७७१०५५०/- होत आहे. वरील निविदा तक्ता क्र. १ ते ३ यांची एकत्रित निविदा काढल्यास एकच ठेकेदार नियुक्त होऊन सदर ठेकेदाराची संपूर्ण महानगरपालिकेवर बाजाराबाबत मक्तेदारी असल्याचे दिसून येईल. त्यामुळे इतर ठेकेदारांना ठेका मिळण्याची शक्यता कमी होईल. त्यामुळे वरील ३ स्वतंत्र निविदा काढल्यास महानगरपालिकेस आर्थिक वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही तसेच वसुली करणे सोईचे होईल.

वरील प्रमाणे प्रभाग समिती "ए ते आय" (डी वगळून) मध्ये एकुण २५ आठवडे व दैनंदिन बाजार चालू असून सर्व बाजारांची दि. ०१/१०/२०२५ ते दि. ३०/०९/२०२८ या तीन वर्षे (३६ महिने) कालावधी करीता किंवा निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन करारनामा करुन कार्यादेश दिल्यापासून पुढील ३ वर्षाकरीता किमान देकाराची निविदा क्र. १ एकुण रक्कम रु.८८६८७२१३/- निविदा क्र. २ एकुण रक्कम रु.१४८१०८७३०/-. व निविदा क्र. ३ एकुण रक्कम रु. १६७७१०५५०/- अशा स्वतंत्र ३ निविदेची रक्कम गृहित धरुन ई-बोली निविदा मसुदा तयार करण्यात येत आहे. या अगोदर वरील सर्व बाजारांची एकत्रित एक वर्षाची निविदा रक्कम रु. ८,९३,८३,६१८/- व त्यावर प्रत्येक वर्षी १०% वाढ करुन ३ वर्षाकरीता एकत्रित रक्कम रु.३२,५४,४५,७४७/- होत आहे. त्याबाबतचा तक्ता क्र. १ सोबत जोडला आहे. तसेच नविन वाढीव दरानुसार वरील सर्व बाजारांची एकत्रित वार्षिक रक्कम रु.१२,२२,०७,४००/- व त्यावरील २ वर्षात १०% वाढ करुन रक्कम रु. ४०,४५,०६,४९३/- इतक्या एकत्रित निविदेची रक्कम होत आहे. त्याबाबतचा तक्ता क्र. २ सोबत जोडला आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या फंडात रक्कम रु.७,९०,६०,७४६/- इतक्या रक्कमेची वाढ होत आहे.

सबब निविदा क्र. १ ते ३ अनुक्रमे १- प्रभाग समिती अ, बोळींज बाजार व प्रभाग समिती सी चंदनसार बाजार रक्कम रु. ८,८६,८७,२१३/- (आठ कोटी श्याऐंशी लाख सत्याऐंशी हजार दोनशे तेरा रुपये मात्र),

वरील प्रमाणे निविदा तक्ता क्र. १ प्रभाग समिती अे व प्रभाग समिती सी यांची ३ वर्षाकरीता निविदेची रक्कम रु.८८६८७२१३/-होत आहे. निविदा तक्ता क्र. २ प्रभाग समिती बी, प्रभाग समिती ई व प्रभाग समिती एच यांची ३ वर्षाकरीता निविदेची रक्कम रु.१४८१०८७३०/- व निविदा तक्ता क्र. ३ प्रभाग समिती प्रभाग एफ. प्रभाग समिती जी व प्रभाग समिती आय यांची ३ वर्षाकरीता निविदेची रक्कम रु. १६७७१०५५०/- होत आहे. वरील निविदा तक्ता क्र. १ ते ३ यांची एकत्रित निविदा काढल्यास एकच ठेकेदार नियुक्त होऊन सदर ठेकेदाराची संपूर्ण महानगरपालिकेवर बाजाराबाबत मक्तेदारी असल्याचे दिसून येईल. त्यामुळे इतर ठेकेदारांना ठेका मिळण्याची शक्यता कमी होईल. त्यामुळे वरील ३ स्वतंत्र निविदा काढल्यास महानगरपालिकेस आर्थिक वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही तसेच वसुली करणे सोईचे होईल.

वरील प्रमाणे प्रभाग समिती "ए ते आय" (डी वगळून) मध्ये एकुण २५ आठवडे व दैनंदिन बाजार चालू असून सर्व बाजारांची दि. ०१/१०/२०२५ ते दि. ३०/०९/२०२८ या तीन वर्षे (३६ महिने) कालावधी करीता किंवा निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन करारनामा करुन कार्यादेश दिल्यापासून पुढील ३ वर्षाकरीता किमान देकाराची निविदा क्र. १ एकुण रक्कम रु.८८६८७२१३/- निविदा क्र. २ एकुण रक्कम रु.१४८१०८७३०/-. व निविदा क्र. ३ एकुण रक्कम रु. १६७७१०५५०/- अशा स्वतंत्र ३ निविदेची रक्कम गृहित धरुन ई-बोली निविदा मसुदा तयार करण्यात येत आहे. या अगोदर वरील सर्व बाजारांची एकत्रित एक वर्षाची निविदा रक्कम रु. ८,९३,८३,६१८/- व त्यावर प्रत्येक वर्षी १०% वाढ करुन ३ वर्षाकरीता एकत्रित रक्कम रु.३२,५४,४५,७४७/- होत आहे. त्याबाबतचा तक्ता क्र. १ सोबत जोडला आहे. तसेच नविन वाढीव दरानुसार वरील सर्व बाजारांची एकत्रित वार्षिक रक्कम रु.१२,२२,०७,४००/- व त्यावरील २ वर्षात १०% वाढ करुन रक्कम रु. ४०,४५,०६,४९३/- इतक्या एकत्रित निविदेची रक्कम होत आहे. त्याबाबतचा तक्ता क्र. २ सोबत जोडला आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या फंडात रक्कम रु.७,९०,६०,७४६/- इतक्या रक्कमेची वाढ होत आहे.

सबब निविदा क्र. १ ते ३ अनुक्रमे १- प्रभाग समिती अ, बोळींज बाजार व प्रभाग समिती सी चंदनसार बाजार रक्कम रु. ८,८६,८७,२१३/- (आठ कोटी श्याऐंशी लाख सत्याऐंशी हजार दोनशे तेरा रुपये मात्र), अनुक्रमे २- प्रभाग समिती बी, ई व एच बाजार रक्कम रु. १४,८१,०८,७३०/- (चौदा कोटी एक्याऐंशी लाख आठ हजार सातशे तीस रुपये मात्र) अनुक्रमे ३- प्रभाग समिती एफ, जी व आय बाजार रक्कम रु. १६,७७,१०,५५०/- (सोळा कोटी सत्त्याहत्तर लाख दहा हजार पाचशे पन्नास रुपये मात्र) या निविदेकरीता स्वतंत्र ३ ठेका पद्धतीने ठेकेदार नियुक्त करणेकामी ई - बोली निविदा व जाहिर नोटीस प्रसिध्द करुन प्राप्त जादा दराच्या रक्कमेवर १८% GST व १% आयकर (TCS) तसेच शासनाचे इतर कर लागू होत असल्यास ठेकेदारावर बंधनकारक करुन महाराष्ट्र शासन निर्णय क्र. भाखंस२०२१/ प्र.क्र./८/ उद्योग -४ अन्वये सदरचा ई-बोली प्रस्ताव प्रशासकीय व आर्थिक मान्यतेस्तव सादर. तसेच प्रशासकीय ठरावावर स्वाक्षरी होण्यास विनंती. आणि सदरची ई- बोली निविदा मनपा संकेतस्थळावर व वर्तमानपत्रात प्रसिद्ध करणेकामी मान्यतेकरीता सविनय सादर.

**प्रस्तावाचा निर्णय** : प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे दि. ०१/१०/२०२५ ते दि. ३०/०९/२०२८ (३६ महिने) या तीन वर्षे कालावधी करीता किंवा निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन करारनामा करुन कार्यादेश दिल्यापासून पुढील ३ वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील अनुक्रमे १- प्रभाग समिती ए, बोळींज बाजार व प्रभाग समिती सी चंदनसार बाजार रक्कम रु. ८,८६,८७,२१३/- (आठ कोटी श्याऐंशी लाख सत्याऐंशी हजार दोनशे तेरा रुपये मात्र), अनुक्रमे २- प्रभाग समिती बी, ई व एच बाजार रक्कम रु. १४,८१,०८,७३०/- (चौदा कोटी एक्याऐंशी लाख आठ हजार सातशे तीस रुपये मात्र) अनुक्रमे ३- प्रभाग समिती एफ, जी व आय बाजार रक्कम रु. १६,७७,१०,५५०/- (सोळा कोटी सत्त्याहत्तर लाख दहा हजार पाचशे पन्नास रुपये मात्र) या रक्कमेवर सर्व दैनंदिन व आठवडे बाजार कर वसुली करणेकरीता ठेका नियुक्त करणेसाठी वरील प्रमाणे ३ निविदा काढणेकामी ई-बोली निविदेस व मंजुर ई-बोली रक्कमेवर १८% GST व १% आयकर (TCS) आकारण्यास तसेच शासनाचे इतर कर लागू असल्यास ठेकेदारकडून वसुली करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७ (३) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार दि.०१/१०/२०२५ ते दि. ३०/०९/२०२८ (३६ महिने) तीन वर्षे कालावधी करीता किंवा निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन करारनामा करुन कार्यादेश दिल्यापासून पुढील ३ वर्षाकरीता बाजार कर वसुली ठेका नियुक्त करणेकामी ई-बोली निविदा मनपा संकेतस्थळावर व वर्तमानपत्रात प्रसिद्ध करणेकामी प्रशासकिय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

**मनोजकुमार सुर्यवंशी** (भाप्रसे)
**आयुक्त**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

**वसई विरार शहर महानगरपालिका**
**मुख्य कार्यालय, यशवंत नगर, विरार (प) जि. पालघर, पिन नं. ४०१३०५**
**दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७**
**ई-मेल - vasaivirarcorporation@yahoo.com**

**प्रशासकिय ठराव क्रं.** १३०८

**विभाग :- बाजार विभाग**
**दिनांक :-** 08/10/2024

**प्रस्तावाचा विषय** : महानगरपालिकेच्या आठवडे व दैनंदिन बाजारातील महसूली उत्पन्नामध्ये वाढ होणेकरीता बाजारांचे दर निश्चित करणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकुर** : सादर करणेत येते की, वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती अे ते आय या प्रभाग समिती मध्ये विविध ठिकाणी आठवडे व दैनंदिन बाजार भरविले जातात. सदर बाजरामध्ये विविध प्रकारचे साहित्य उदा. भाजी, फळे मच्छि, चिकन अंडी वगैरे विविध टोपली, हातगाडी, टपरी यामध्ये विक्री साठी येत असतात. सदर साहित्यांचे दर वेगवेगळे असून टोपली ते हातगाडी पर्यंत कमाल ३० रु.तसेच चार चाकी वाहनापर्यंत कमाल १००/- रु.असे दैनंदिन बाजाराचे दर मा. स्थायी समिती ठराव क्र. २ दि. ०२/०५/२०२० अन्वये मंजुर करण्यात आलेले असून पूर्वीचे प्रचलित दरासह मंजुर प्रस्तावित दराचा तपशिल खालीलप्रमाणे.

**तक्ता क्र. १**

| अ.क्र. | तपशिल | पुर्वीचे प्रचलित दर | तत्कालिन प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| १ | लहान टोपली – भाजीपाला | रु. २/- | रु. ५/- |
| २ | झाप – भाजीपाला | रु. ३/- | रु. ५/- |
| ३ | बोझा (पालक भाजी/इतर भाजी) | रु. ४/- | रु. ५/- |
| ४ | सिमेंट गोण (भाजीपाला) | रु. ४/- | रु. १०/- |
| ५ | खताच्या गोणी मध्ये भरलेला भाजीपाला (५० किलो) | रु. ६/- | रु. १२/- |
| ६ | नारळ कोड | रु. १०/- | रु. २०/- |
| ७ | केळीचे लोंगर (लहान/मोठे) १ नग | रु. २/- | रु. ५/- |
| ८ | टोपली (फक्त विक्री) | रु. ६/- | रु. ८/- |
| ९ | हातगाडी (६ X ४) | रु. २४/- | रु. ३०/- |
| १० | प्रत्येक पहिल्या १० चौ. फुटाला किंवा त्याच्या भागाला | रु. ५/- प्रति चौ. | रु. ६/- प्रति चौ.फुट |
| | त्यापुढील प्रत्येक २.५ चौ.फुटाला किंवा त्याच्या भागाला. | -- | रु. २/- |
| ११ | बाजारमाल वाहनातुन विक्रीसाठी आणल्यास अथवा बाजारमाल वाहनात ठेऊन विक्री केल्यास | रु.३/-तीन चाकी वाहनाकरीता | रु. ७०/- तीन चाकी वाहनाकरीता |
| १२ | किरकोळ कटलरी साहित्य विक्री (मणी, टिकल्या, बांगड्या, फुगे वैगरे) | रु. २/- प्रति चौ. फुट | रु. २/- प्रति चौ.फुट |
| १३ | बांबुच्या वस्तु, मातीची भांडी, सर्व प्रकारचे दोर प्रत्येक पहिल्या १० चौ. फुटाला किंवा त्याच्या भागाला | रु. २/- प्रति चौ.फुट | रु. २/- प्रति चौ.फुट |
| | प्रत्येक पुढील ५ चौ. फुटाला किंवा त्याच्या भागाला | रु. २/- | रु. ४/- |
| १४ | मासे, सुकवलेले मासे व अंड्याची दुकाने प्रत्येक २.५ चौ. फुटाला किंवा त्याच्या भागाला | रु. २/- | रु. ४/- |
| १५ | मोच्याची दुकाने, चुना विक्रीची दुकाने, बारी (पानाची दुकाने),आगपेटीच्या विक्रीची दुकाने, हत्यारांच्या [illegible] प्रत्येकी किंवा | रु. २/- | रु. १०/- |
| १६ | जळाऊ लाकूड- सरपण | रु. ३/- | रु. ३/- |
| १७ | जळाऊ लाकूड (प्रत्येक गाडीस, मोटारीस) | रु. ३/- | रु. १०/- |

वरील प्रमाणे वसई विरार शहर महानगरपालिकाचे प्रस्तावित दराची सन २०२०-२१ पासून अमंलबजावणी करण्यात आलेली आहे. व सदर दर हे पुढील ३ वर्षासाठी असून ३ वर्षानंतर बाजराचे पुर्नविलोकन करुन दर प्रस्तावित करणेबाबत मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. २ दि. ०२/०५/२०२० अन्वये नमुद आहे. सदरचे प्रस्तावित दर व महानगरपालिकेचे संपूर्ण क्षेत्रफळ पाहता प्रस्तावित दर हे वसई विरार शहर महानगरपालिकेच्या लगत असलेल्या इतर

महानगरपालिकेच्या तुलनेत अल्प प्रमाणात असल्याचे निदर्शनात दिसून येत आहे. त्याबबत इतर महानगरपालिके कडून सद्याचे बाजार करा बाबतचे प्रस्तावित दर मागविण्यात आलेले असून त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे.

तक्ता क्र. २

| अ. क्र. | तपशिल | भिवंडी निजामपूर शहर | मिरा भाईंदर महानगरपालिका | कल्याण डोंबिवली | पनवेल महानगरपालिका |
|---|---|---|---|---|---|
| १ | नाशवंत वस्तू | १५/- | - | - | - |
| २ | टिकाऊ वस्तू | ३०/- | - | - | - |
| ३ | खाद्य पदार्थ वस्तू | ६०/- | - | - | - |
| ४ | गाळे | १००/- | - | - | - |
| ५ | ओटले | ५०/- | - | ३०/- | - |
| ६ | लाकडी केबिन | ५०/- | - | - | - |
| ७ | लहान जनावर मास विक्री फी | - | - | ५०/- | - |
| ८ | मोठ्या जनावर मासं विक्री फी | - | - | २००/- | - |
| ९ | भाजी व फळे विक्री फी | - | - | - | ५०/- |
| १० | भाजी/फळे/मासं व्यतिरिक्त इतर साहित्य विक्री फी | - | ७५/- | - | ५०/- |
| ११ | मटण/ चिकन/ मासळी/ अंडी विक्री फी | - | १००/- | - | १००/- |
| १२ | टोपली | - | - | १०/- प्रति टोपली | २५/- प्रति टोपली |
| १३ | हातगाडी | - | - | ५०/- | ५०/- |
| १४ | टपरी | - | - | | १००/- |

वरील प्रमाणे इतर महानगरपालिकेचे बाजार करा बाबत दराची तुलना केली असता वसई विरार शहर महानगरपालिकेचे सद्या लागू असलेले दर हे अत्यल्प स्वरुपाचे असल्याचे निर्देशनात येते. त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे.

तक्ता क्र. ३

| अ.क्र. | तपशिल | तत्कालिन प्रस्तावित दर |
|---|---|---|
| १ | लहान टोपली — भाजीपाला | रु. ५/- |
| २ | झाप - भाजीपाला | रु. ५/- |
| ३ | बोझा (पालक भाजी/इतर भाजी) | रु. ५/- |
| ४ | सिमेंट गोण (भाजीपाला) | रु. १०/- |
| ५ | खताच्या गोणी मध्ये भरलेला भाजीपाला (५० किलो) | रु. १२/- |
| ६ | नारळ कोड | रु. २०/- |
| ७ | केळीचे लोंगर (लहान/मोठे) १ नग | रु. ५/- |
| ८ | टोपली (फक्त विक्री) | रु. ८/- |
| ९ | हातगाडी (६ X ४) | रु. ३०/- |
| १० | प्रत्येक पहिल्या १० चौ. फुटाला किंवा त्याच्या भागाला | रु. ६/- प्रति चौ.फुट |
| | त्यापुढील प्रत्येक २.५ चौ.फुटाला किंवा त्याच्या भागाला. | रु. २/- |
| ११ | बाजारमाल वाहनातुन विक्रीसाठी आणल्यास अथवा बाजारमाल | रु. ७०/- तीन चाकी |
| १२ | किरकोळ कटलरी साहित्य विक्री (मणी, टिकल्या, बांगड्या, फुगे | रु. २/- प्रति चौ.फुट |
| १३ | बांबुच्या वस्तु, मातीची भांडी, सर्व प्रकारचे दोर | रु. २/- प्रति चौ.फुट |
| | प्रत्येक पुढील ५ चौ. फुटाला किंवा त्याच्या भागाला | रु. ४/- |
| १४ | मासे, सुकवलेले मासे व अंड्याची दुकाने प्रत्येक २.५ चौ. फुटाला | रु. ४/- |
| १५ | मोच्याची दुकाने, चुना विक्रीची दुकाने, बारी (पानाची दुकाने), | रु. १०/- |
| १६ | जळाऊ लाकूड- सरपण | रु. ३/- |
| १७ | जळाऊ लाकूड (प्रत्येक गाडीस, मोटारीस) | रु. १०/- |

वरील प्रमाणे महानगरपालिकेच्या तक्ता क्र.३ मधिल असलेल्या १ ते १७ तपशिला मध्ये विविध प्रकारच्या वस्तूच्या विक्री करीता वेगवेगळे व अल्प तत्कालिन प्रस्तावित दर निश्चित केलेले दिसून येते. त्यामुळे बाजार कर वसूलीच्या दरात गोंधळ निर्माण होत असतो. महानगरपालिकेच्या महसुली उत्तपन्नात वाढ होणेकरीता किरकोळ विक्रीच्या साहित्याचे दर एकत्रित करुन कमीत कमी साहित्याचा तपशिल बनविण्यात येऊन इतर महानगरपालिकेच्या प्रस्तावित बाजार कर चालू दराशी

तुलनात्मक दर तयार करण्यात येत असून तसचे मा. स्थायी समिती सभा क्र. २ दि.०२/०५/२०२० अन्वये ३ वर्षानंतर नविन दर प्रस्तावित करणेबाबत सुचित करण्यात आल्यानुसार त्याबाबत तपशिल खालीलप्रमाणे. ६/५७

तक्ता क्र. ४

| अ.क्र | तपशिल | एकत्रिकरण केलेले वाढीव प्रस्तावित दर |
|---|---|---|
| १ | भाजी / फळे विक्री मोठी टोपली/ नारळ कोड | ६०/- |
| २ | भाजी/फळे/मासं व्यतिरिक्त इतर साहित्य विक्री फी | ७५/- |
| ३ | मटण/ चिकन विक्री फी | ७०/- |
| ४ | लहान टोपली / झाप - भाजीपाला/ बोझा (पालक भाजी/इतर भाजी)/ केळीचे लोंगर (लहान/मोठे) १ नग / किरकोळ कटलरी साहित्य विक्री (मणी, टिकल्या, बांगड्या, फुगे वैगरे) बांबुच्या वस्तु, मातीची भांडी, सर्व प्रकारचे दोर / मासे, सुकवलेले मासे व अंड्याची दुकाने / जळाऊ लाकूड- सरपण/ टोपली (फक्त विक्री) | १०/- |
| ५ | हातगाडी / टपरी /बाकडी | ७५/- |
| ६ | तीन चाकी वाहनामधिल बाजार माल विक्री | ७५/- |
| ७ | चार चाकी वाहनांमधिल बाजार माल विक्री | १००/- |
| ८ | सिमेंट गोण (भाजीपाला)/ खताच्या गोणी मध्ये भरलेला भाजीपाला (५० किलो)/ मोच्याची दुकाने, चुना विक्रीची दुकाने, बारी (पानाची दुकाने),आगपेटीच्या विक्रीची दुकाने, हत्यारांच्या पात्यांना धार लावणे / जळाऊ लाकूड (प्रत्येक गाडीस, मोटारीस) | ३०/- |
| ९ | प्रत्येक पहिल्या १० चौ. फुटाला किंवा त्याच्या भागाला | रु. ८/- प्रति चौ.फुट |
| | त्यापुढील प्रत्येक २.५ चौ.फुटाला किंवा त्याच्या भागाला. | रु. ३/- प्रति चौ.फुट |

वरील नमुद तक्ता क्र. १, २ व ३ यांची तुलनात्मक विगतवारी करुन तक्ता क्र. ४ नुसार कमीत कमी तपशिला मध्ये बाजार फी वसुली दराचे समानीकरण करुन मा. स्थायी समिती ठराव क्र. २ दि. ०२/०५/२०२० अन्वये सन २०२५-२६ या वर्षापासुन वाढीव प्रस्तावित दर तयार करण्यात येत असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियामातील कलम ३३२ (अ) अन्वये दर निश्चित करणे उचित ठरेल. तरी सदरच्या प्रस्तावित दरास मंजुरी मिळणेकरीता प्रशासकीय मान्यतेस्तव सादर.

**प्रस्तावाचा निर्णय** : प्रस्तावित केल्यानुसार प्रभाग समिती ए ते आय उपरोक्त नमुद सन २०२५-२६ वर्षापासून दैनंदिन व आठवडे बाजार वसूलीचे दर महानगरपालिकेच्या संपूर्ण कार्यक्षेत्रात बाजार फी वसूली दराचे समानिकरण करुन बाजार फी वसुलीच्या नविन वाढीव दरास प्रस्तावित केल्याप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७ (३) (क) अन्वये सदर दरास प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

मनोजकुमार सुर्यवंशी (भाप्रसे)
आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (प.), जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०३
दुरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. १३१०

विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :- ०८/१०/2025

**प्रस्तावाचा विषय** :- महानगरपालिका विरार (पु.) येथील जुने मुख्यालय इमारतीमधील मे.इरॉस एलिवेटर्स ॲण्ड एस्केलेटर्स प्रा.लि. व मे. इन्फीनिटी एलिवेटर्स इंडिया या कंपनीचे उद्वाहक निर्लेखित करुन साहित्य Buy-Back पद्धतीने विक्री करणेकामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत....

**प्रस्तावाचा मजकुर :-**

1) संदर्भ :- 1) मा.आयुक्त तथा प्रशासक सो.यांचे दि.23/05/2025 रोजीचे जा.क्र: वविशम / आस्था/922/2025 अन्वये आदेश.
2) मा.अतिरिक्त आयुक्त (विद्युत) यांची दि.27/05/2025 रोजीची मंजुरी टिपणी.

1) अंदाजपत्रकीय रक्कम :- B-2

2) कामाची आवश्यकता :- महानगरपालिकेचे विरार (पु.) येथील जूने मुख्यालय इमारतीचे बाहेरील बाजुस मे.इरॉस एलिवेटर्स ॲण्ड एस्केलेटर्स प्रा.लि. या कंपनीचे 6 प्रवासी क्षमता असलेली 1 उद्वाहक व इमारतीचे आतील बाजुस मे. इन्फीनिटी एलिवेटर्स इंडिया या कंपनीचे 8 प्रवासी क्षमतेचे असलेली 1 उद्वाहक असे एकूण 2 उद्वाहक बसविण्यात आले आहेत. सदर दोन्ही उद्वाहक महानगरपालिका स्थापनेपासुन बसविणेंत आले असल्याने सद्यस्थितीत सुरु असले तरी 15 वर्षापेक्षा जास्त कालावधी झाल्याने कालबाह्य झाले आहेत. तसेच, उद्वाहकातील मुख्य कंट्रोल पॅनल, मोटर, रोप, लिफ्ट कॅबिन इ.साहित्य जुन्या पद्धतीचे असल्याने उद्वाहक इतर ठिकाणी बसवून त्याचा पुर्नवापर करणे शक्य होणार नाही.

सद्यस्थितीत विरार (पु.) येथील मनपाचे जुने मुख्यालय इमारत अति-धोकादायक इमारतींच्या प्रवर्गात समविष्ट झाली असल्याने इमारतीमधील सर्व साहित्य स्थलांतरीत व विल्हेवाट लावणेबाबत मा.आयुक्त महोदय यांनी संदर्भिय क्र.1 अन्वये आदेशित केले आहे.

त्यानुसार, सदरचे दोन्ही उद्वाहक निर्लेखित करणेकामी संदर्भिय क्र.2 चे टिपणी अन्वये मा.अतिरिक्त आयुक्त (विद्युत) यांनी मंजुरी दिली आहे.

सदर उद्वाहक निर्लेखित केल्यावर त्यांची योग्य प्रकारे विल्हेवाट लावणे करीता उद्वाहकांतील साहित्य विक्री करणे आवश्यक आहे. त्यानुसार दोन उद्वाहकांतील साहित्यांचा सविस्तर तपशिल व साहित्यांचे अंदाजित परिमाण खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | साहित्य | परिमाण |
|---|---|---|
| 1 | लिफ्ट कंट्रोलर | 2 नग |
| 2 | लिफ्ट COP पॅनल जी+4 | 2 नग |
| 3 | लिफ्ट LOP पॅनल | 10 नग |
| 4 | लिफ्ट मशीन | 2 नग |
| 5 | लिफ्ट मेन रोप व OSG रोप | 200 कि.ग्रॅ. |
| 6 | लिफ्ट कॅबीन, लँडींग डोअर, कॅबिन रेल, काँऊटर वेट रेल, कॅबिन फ्रेम, काँऊटर वेट फ्रेम, रेल ब्रॅकेट | 700 कि.ग्रॅ. |
| 7 | OSG आणि वेट पुली | 2 नग |
| 8 | लँडींग गेटलॉक | 10 नग |
| 9 | ट्रॅव्हलिंग आणि शॉफ्ट वायर | 100 मी. |
| 10 | कॅबिन फॅन | 2 नग |

सदर जूने साहित्य भंगार दराने विक्री करावयाचे असल्यास दोन उद्वाहक निर्लेखित करणेकामी प्राप्त दरपत्राकानुसार अंदाजित 84,000/- रु. खर्च होणार आहे. तथापि, सदर साहित्य Buy-Back पद्धतीने त्याच ठेकेदाराला विक्री केले असता त्यातुन अधिक उत्पन्न मिळवुन महानगरपालिकेचा अर्थिक लाभ होऊ शकतो.

महानगरपालिका क्षेत्रात विद्युतीय कामे करणेकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, विद्युत जिल्हा दरसूचीचा वापर करुन कामांची अंदाजपत्रके तयार करण्यात येतात. परंतु, उद्वाहक निर्लेखित करणे व उद्वाहकांतील साहित्य buy-back पद्धतीने विक्री करणे कामाचे दर विद्युत जिल्हा दर सुची मध्ये उपलब्ध नाहीत.

याकरीता, सदर दोन्ही उद्वाहकांची उत्पादक कंपनी मे.इरॉस एलिवेटर्स अॅण्ड एस्केलेटर्स प्रा.लि. व मे. इन्फीनिटी एलिवेटर्स इंडिया तसेच, त्यांची देखभाल दुरुस्ती करणेकामी नियुक्त ठेकेदार मे. सन शाईन इलेव्हेटर्स यांना दि.11/06/2025 रोजीचे पत्रान्वये बाजारभाव दर सादर करणेबाबत कळविणेंत आले.

त्यानुसार, विहीत मुदतीत मे. इन्फीनिटी एलिवेटर्स इंडिया व मे. सन शाईन इलेव्हेटर्स यांनी दोन उद्वाहक निर्लेखित करुन साहित्य Buy-Back पद्धतीने खरेदी करणेकामी खालील प्रमाणे दर सादर केले असून मे.इरॉस एलिवेटर्स अॅण्ड एस्केलेटर्स प्रा.लि. यांनी आजतागयात दर सादर केले नाहीत.

| अ. क्र. | निविदाधारकाचे नाव | निविदेतील दर (दोन उद्वाहकांकरीता) | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | मे.इरॉस एलिवेटर्स अॅण्ड एस्केलेटर्स प्रा.लि. | दर दिले नाहीत | - |
| 2 | मे. इन्फीनिटी एलिवेटर्स इंडिया | 36,000/- | - |
| **3** | **मे. सन शाईन इलेव्हेटर्स** | **60,000/-** | **अधिकतम दर** |

मे. सन शाईन इलेव्हेटर्स यांनी सादर केलेल्या दरानुसार उद्वाहक परात (Scaffolding) बांधुन निर्लेखित करणेकामी प्रत्येकी 42,000/-रु. मेहनताना प्रमाणे दोन उद्वाहकांकरीता 84,000/- रु. मेहनताना खर्च कंपनीला होणार असून, मेहनताना खर्च वजा करुन दोन उद्वाहकांकरीता 60,000/-रु. (GST व इतर कर वगळुन) दराने महानगरपालिकेमार्फत साहित्य खरेदी करण्याचे दर सादर केले आहेत. सदर दरांवर लेखा विभागाचे प्रचलित पद्धतीने GST व इतर कर आकारण्यात येतील.

त्यानुसार, उद्वाहक निर्लेखित करुन त्याच कंपनीला उद्वाहकांचे संपूर्ण साहित्य विक्री केले असता महानगरपालिकेला रक्कम 60,000/- रु. इतका अर्थिक लाभ होऊ शकतो.

उपरोक्त विषयांकीत कामी ऑनलाईन दरपत्रक प्रसिद्ध करुन उद्वाहकातील साहित्य विक्री केल्यास प्राप्त दरापत्रकापेक्षा अधिक लाभ महानगरपालिकेला मिळविता येऊ शकतो. याकरीता, सदर कामी ऑनलाईन पद्धतीने जाहिर दरपत्रक सूचना प्रसिद्धी करुन निविदेची पुढील कार्यवाही करणे आवश्यक आहे.

3) मालकी :- वसई विरार शहर महानगरपालिका मालकीची इमारत

4) कामाचे स्वरुप :- दोन उद्वाहक निर्लेखित करुन साहित्य buy-back पद्धतीने विक्री करणे

तरी, उपरोक्त विषयांकीत कामी ऑनलाईन दरपत्रक प्रसिद्ध करुन उद्वाहकातील साहित्य विक्री केल्यास त्यातुन मिळणारे उत्पन्न **सन 2025-26** च्या अर्थसंकल्पातील विद्युत विभागाकडील **"दिवाबत्ती संकिर्ण"** या लेखाशिर्षकावर जमा करता येतील.

तरी, महानगरपालिका विरार (पु.) येथील जुने मुख्यालय इमारतीमधील मे.इरॉस एलिवेटर्स ॲण्ड एस्केलेटर्स प्रा.लि. व मे. इन्फीनिटी एलिवेटर्स इंडिया या कंपनीचे उद्वाहक निर्लेखित करुन साहित्य Buy-Back पद्धतीने विक्री करणे कामाचे प्रस्तावास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणे, तसेच सदर कामी ऑनलाईन ई-निविदा मागवुन कार्यवाही करणेंकामी मान्यतेस्तव सादर.

सदर कामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेणे, संविदा मंजुरी प्राप्त करणे, निविदाधारकासोबत करारनामा करुन कार्यादेश देणे, काम सुरु करुन विहीत मुदतीत पुर्ण करणे व देयक सादर करणे ई. सर्व प्रक्रिया पुढील नमुद कालमर्यादित पुर्ण होणे अपेक्षित आहे.

| अ.क्र | बाब | अपेक्षित दिनांक |
|---|---|---|
| 1) | प्रशासकीय व वित्तीय मान्यता ठराव | सक्षम अधिकाऱ्याकडुन मंजुरी मिळाल्यानंतर तात्काळ |
| 2) | निविदा प्रसिध्द करणे | 01/10/2025 |
| 3) | प्रथम लिफाफा उघडणे | 10/10/2025 |
| 4) | व्दितीय लिफाफा उघडणे | 23/10/2025 |
| 5) | संविदा मंजुरी ठराव | 07/11/2025 |
| 6) | कार्यदेश देणे / करारनामा करणे | 13/11/2025 |
| 7) | काम सुरु करणे | 13/11/2025 |
| 8) | काम पुर्ण करणे | 13/12/2025 |
| 9) | देयक सादर करणे | 26/12/2025 |
| 10) | देयक प्रदान करणे | 05/01/2026 |

तरी सदर प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव मा.आयुक्त तथा प्रशासक ह्यांचेकडे सविनय सादर.

---

**प्रस्तावाचा ठराव :-** सदर काम खालील नमुद कालावधीत पुर्ण होणे अपेक्षित आहे.

| अ.क्र | बाब | अपेक्षित दिनांक |
|---|---|---|
| 1) | प्रशासकीय व वित्तीय मान्यता ठराव | सक्षम अधिकाऱ्याकडुन मंजुरी मिळाल्यानंतर तात्काळ |
| 3) | निविदा प्रसिध्द करणे | 01/10/2025 |
| 4) | प्रथम लिफाफा उघडणे | 10/10/2025 |
| 5) | व्दितीय लिफाफा उघडणे | 23/10/2025 |
| 6) | संविदा मंजुरी ठराव | 07/11/2025 |
| 7) | कार्यदेश देणे / करारनामा करणे | 13/11/2025 |
| 8) | काम सुरु करणे | 13/11/2025 |
| 9) | काम पुर्ण करणे | 13/12/2025 |
| 10) | देयक सादर करणे | 26/12/2025 |
| 11) | देयक प्रदान करणे | 05/01/2026 |

सदर कामाकरिता उपरोक्त नमुद केलेल्या कालमर्यादा पाळल्या न गेल्यास विभाग प्रमुख व त्याचे अधिनिस्त कर्मचारी MCSR 1979 प्रमाणे कार्यवाहीस पात्र राहतील. प्रस्तावित कालमर्यादेत तांत्रिक अथवा प्रशासकिय कारणास्तव तसेच नैसर्गिक आपत्ती व इतर अपवादात्मक परिस्थितीमुळे विलंब झाल्यास नमुद कारणासह सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेणे बंधनकारक राहील. तरी, महानगरपालिका विरार (पु.) येथील जुने मुख्यालय इमारतीमधील मे.इरॉस एलिवेटर्स ॲण्ड एस्केलेटर्स प्रा.लि. व मे. इन्फीनिटी एलिवेटर्स इंडिया या कंपनीचे उद्वाहक निर्लेखित करुन साहित्य buy-back पद्धतीने विक्री करणेकामी प्रशासकिय व वित्तीय मंजुरी देणेंत येत आहे. तसेच प्रत्येक टप्प्यावर केलेल्या कामाचे Geo Tagged फोटोग्राफ्स सादर करणेंत यावे. तद्‌नंतरच कामाची रक्कम अदा करणेंत यावी.

**मनोजकुमार सूर्यवंशी (भा.प्र.से)**
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

**वसई-विरार शहर महानगरपालिका**
**मुख्य कार्यालय, विरार पश्चिम, जि. पालघर, पिन नं — ४०१३०३**
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. १३११

विभाग :
दिनांक : १०/१०/२०२५

---

**प्रस्तावाचा विषय:-** प्रभाग समिती 'आय' कार्यक्षेत्रातील **वॉर्ड क्र. ११० मधील गौळवाडा महानगरपालिका मार्केट दुरुस्ती करणे** याकामी प्राप्त निविदापैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणे बाबत.

| | | |
|---|---|---|
| ई-निविदा क्र. | :- | २०२५_VVCMC_११९४७९२_११ |
| अंदाजपत्रकीय रक्कम | :- | रु. ४,९८,००२/- |
| तांत्रिक मान्यता रक्कम | :- | रु. ४,९८,००२/- |
| निविदा रक्कम | :- | रु. ४,९८,००२/- |
| प्रशासकीय मान्यता | :- | मा. आयुक्त तथा प्रशासक हयांचा ठ.क्र. ६८४ दि. ०६/०६/२०२५ |
| तांत्रिक मंजुरी | :- | प्र. शहर अभियंता पा.क्र. ०६ अ.क्र. ३८ दि. १२/०६/२०२५ |
| निविदा सुचना प्रसिध्दी दिनांक | :- | दि. २७/०६/२०२५ |
| निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा) | :- | दि. ०४/०७/२०२५ |
| प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी | :- | प्र. शाखा अभियंता |
| द्वितीय लखोटा उघडल्याची दिनांक | :- | दि. ०१/०८/२०२५ |

<u>प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे :-</u>

| अ. क्र. | निविदाधारकाचे नाव | निविदा दर | निविदेचा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्युरिटी बाबत धनाकर्ष तपशिल |
|---|---|---|---|
| १. | मे. निखिल शरद परब | १८.१८% कमी दराने | - |
| २. | मे. नाईक असोसिएटर्स | अंदाजपत्रकीय दराने | - |
| ३. | मे. सहारा एंटरप्रायजेस | २५.००% कमी दराने | - |
| ४. | मे. डी. एस. कंस्ट्रक्शन | २१.५०% कमी दराने | - |
| ५. | मे. अबाबिल एंटरप्रायजेस | २६.००% कमी दराने | एफ.डी.आर क्र. १०८७४०७१ दि. १४/०८/२०२५ |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचा अभ्यास करता **मे. अबाबिल एंटरप्रायजेस** यांची **२६.००% कमी** दराची निविदा प्राप्त झालेली आहे. त्यानुसार सदर निविदांची तुलना केली असता **मे. अबाबिल एंटरप्रायजेस** यांच्या निविदेतील अंदाजपत्रकीय दराने हा तुलनात्मक रित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी व योग्य आहे.

दि. ८/१०/२०२५ रोजी अन्वये मा. निविदा समितीने **मे. अबाबिल एंटरप्रायजेस** यांच्या **२६.००% कमी** दराच्या निविदेच्या मान्यतेसाठी शिफारस केलेली आहे.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये उपरोक्त कमी दराची निविदा मंजूर करुन **मे. अबाबिल एंटरप्रायजेस** यांच्या उपरोक्त कामाची संविदा करणेस मान्यता देणेसाठी विषय शिफारशीसह पुढील उचीत निर्णयास्तव सविनय सादर.

या कामी संविदा मंजुरी प्राप्त करणे, लघुत्तम निविदाधारकासोबत करारनामा करुन कार्यादेश देणे, काम सुरु करुन विहीत मुदतीत पुर्ण करणे व देयक सादर करणे इ. सर्व प्रक्रिया पुढील नमुद कालमर्यादेत पुर्ण होणे अपेक्षित आहे.

| अ. क्र. | बाब | अपेक्षित दिनांक |
|---|---|---|
| १ | प्रशासकीय व वित्तीय मान्यता ठराव | मा. आयुक्त तथा प्रशासक हयांचे कडील ठ. क्र. ६८४ दि. ०६/०६/२०२५ |
| २ | प्र. शहर अभियंता यांची तांत्रिक मंजुरी घेणे. | दि. १२/०६/२०२५ |
| ३ | निविदा प्रसिध्द करणे. | दि. २७/०६/२०२५ |
| ४ | प्रथम लिफाफा उघडणे. | दि. ०४/०७/२०२५ |
| ५ | द्वितीय लिफाफा उघडणे. | दि. ०१/०८/२०२५ |
| ६ | संविदा मंजुरी ठराव. | दि. १०/१०/२०२५ |
| ७ | कार्यादेश देणे/ करारनामा करणे. | दि. १४/१०/२०२५ |
| ८ | काम सुरु करणे. | दि. १५/१०/२०२५ |
| ९ | काम पुर्ण करणे. | दि. १४/११/२०२५ |
| १० | देयक सादर करणे. | दि. २१/११/२०२५ |
| ११ | देयकाचे प्रदान करणे. | दि. २८/११/२०२५ |

**ठराव:-** सदर काम खालील नमुद कालावधीत पुर्ण होणे अपेक्षित आहे.

| अ. क्र. | बाब | अपेक्षित दिनांक |
|---|---|---|
| १ | प्रशासकीय व वित्तीय मान्यता ठराव | मा. आयुक्त तथा प्रशासक हयांचे कडील ठ. क्र. ६८४ दि. ०६/०६/२०२५ |
| २ | प्र. शहर अभियंता यांची तांत्रिक मंजुरी घेणे. | दि. १२/०६/२०२५ |
| ३ | निविदा प्रसिध्द करणे. | दि. २७/०६/२०२५ |
| ४ | प्रथम लिफाफा उघडणे. | दि. ०४/०७/२०२५ |
| ५ | द्वितीय लिफाफा उघडणे. | दि. ०१/०८/२०२५ |
| ६ | संविदा मंजुरी ठराव. | दि. १०/१०/२०२५ |
| ७ | कार्यादेश देणे/ करारनामा करणे. | दि. १४/१०/२०२५ |
| ८ | काम सुरु करणे. | दि. १५/१०/२०२५ |
| ९ | काम पुर्ण करणे. | दि. १४/११/२०२५ |
| १० | देयक सादर करणे. | दि. २१/११/२०२५ |
| ११ | देयकाचे प्रदान करणे. | दि. २८/११/२०२५ |

D:\PRABHAG I\WARD\110\PRABHAG\गौळवाडा मार्केट\D-Tharav.docx

सदर कामाकरीता वरील नमुद केलेल्या कालमर्यादा पाळल्या न गेल्यास संबंधित विभाग प्रमुख व त्यांचे अधिनस्त कर्मचारी MCSR १९७९ प्रमाणे कार्यवाहीस पात्र राहतील तसेच सदर कामामध्ये काही अपरिहार्य कारणास्तव (तांत्रिक, नैसर्गिक व इतर सबब कारणास्तव) विलंब झाल्यास त्या-त्या वेळी विलंबास सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी घेणे बंधनकारक राहील. तरी वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील **वॉर्ड क्र. ११० मधील गौळवाडा महानगरपालिका मार्केट दुरुस्ती करणे** कामी सहभागी झालेल्या निविदाधारकापैकी **मे. अबाबिल एंटरप्रायजेस** हयांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा **२६.००% कमी** दराची निविदा मंजुर करण्यात येत असुन लघुत्तम निविदाधारकासोबत संविदा करणे, २% सुरक्षा अनामत भरणे तसेच करारनामा, कार्यादेश देणे तसेच नामंजुर ठेकेदाराची इसारा रक्कम परत करणे करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ७३(ड) अन्वये मान्यता देणेत येत आहे. तसेच एस्टीमेट मधील प्रत्येक टप्प्यावर केलेल्या कामाचे Geo Tagged फोटोग्राफ्स सादर करणेत यावे. नंतरच कामाची रक्कम अदा करणेत यावी.

(अजित मुठे)
उपायुक्त परिमंडळ-३
प्रभाग समिती आय
वसई विरार शहर महानगरपालिका

**वसई-विरार शहर महानगरपालिका**
**मुख्य कार्यालय, विरार पश्चिम, जि. पालघर, पिन नं.४०१३०३**
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. १३१२ विभाग :
दिनांक : १० / १०/२०२५

---

**विषय:** वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील **वॉर्ड क्र. ११२ मधील पाम इन्फ्रास्ट्रक्चर इमारतीकडे आर.सी.सी. पाईप क्रॉसिंग करणे** याकामी प्राप्त निविदापैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणे बाबत.

| | | |
|---|---|---|
| ई-निविदा क्र. | :- | २०२५_VVCMC_११९४७९२_७ |
| अंदाजपत्रकीय रक्कम | :- | रु. ४,७२,४१५/- |
| तांत्रिक मान्यता रक्कम | :- | रु. ४,६२,४६४/- |
| निविदा रक्कम | :- | रु. ४,६२,४६४/- |
| प्रशासकीय मान्यता | :- | मा. आयुक्त तथा प्रशासक हयांचा ठ.क्र. ३४९ दि. २१/०४/२०२५ |
| तांत्रिक मंजुरी | :- | प्र. शहर अभियंता पा.क्र. ०३ अ.क्र. १६ दि. २६/०५/२०२५ |
| निविदा सुचना प्रसिध्दी दिनांक | :- | दि. २७/०६/२०२५ |
| निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा) | :- | दि. ०४/०७/२०२५ |
| प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी | :- | प्र. शाखा अभियंता |
| द्वितीय लखोटा उघडल्याची दिनांक | :- | दि. २९/०७/२०२५ |

**प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे :-**

| अ. क्र. | निविदाधारकाचे नाव | निविदा दर | निविदेचा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्युरिटी बाबत धनाकर्ष तपशिल |
|---|---|---|---|
| १. | मे. मरासा कंस्ट्रक्शन | २१.९९% कमी दराने | - |
| २. | मे. साई गणेश एंटरप्रायजेस | २६.००% कमी दराने | - |
| ३. | मे. निखिल शरद परब | २२.२३% कमी दराने | - |
| ४. | मे. नाईक असोसिएटर्स | अंदाजपत्रकीय दराने | - |
| ५. | मे. अबाबिल एंटरप्रायजेस | २६.००% कमी दराने | - |

प्राप्त निविदांमध्ये **मे. साई गणेश एंटरप्रायजेस व मे. अबाबिल एंटरप्रायजेस** यांचे दर (२६.००% कमी दराने) समान असल्याने सदर कामाच्या दरांबाबत निर्णय घेणेकामी सिलबंद लिफाफ्यात दर सादर करण्यासाठी **मे. साई गणेश एंटरप्रायजेस व मे. अबाबिल एंटरप्रायजेस** यांना दि. ०६/०८/२०२५ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते.

वाटाघाटीच्या पत्रानुसार त्यांचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| **अ. क्र.** | **निविदाधारकाचे नाव** | **निविदा दर** | **सिलबंद लिफाफ्यातील दर** | **निविदेचा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्युरिटी बाबत धनाकर्ष तपशिल** |
|---|---|---|---|---|
| १. | मे. साई गणेश एंटरप्रायजेस | २६.००% कमी दराने | २६.२०% कमी दराने | धनादेश क्र. १००९७०, दि. १६/०९/२०२५<br>पा.क्र. १८३७८१, दि. १६/०९/२०२५ |
| २. | मे. अबाबिल एंटरप्रायजेस | २६.००% कमी दराने | २६.०५% कमी दराने | - |

त्याअनुषंगाने १३/०८/२०२५ रोजी **मे. साई गणेश एंटरप्रायजेस** यांनी **२६.२०% कमी** दर व **मे. अबाबिल एंटरप्रायजेस** यांनी **२६.०५% कमी** दर सादर केले आहेत.

उपरोक्त निविदेची तुलना केली असता **मे. साई गणेश एंटरप्रायजेस** यांची **२६.२०% कमी** दराची निविदा ही प्राप्त निविदा मधील सर्वात कमी दराची आहे. सदर निविदाधारक **मे. साई गणेश एंटरप्रायजेस** यांचे दर तुलनात्मक दृष्टया इतर निविदाधारकांपेक्षा कमी असुन योग्य व वाजवी आहे.

दि. ८ /१०/२०२५ रोजी अन्वये मा. निविदा समितीने **मे. साई गणेश एंटरप्रायजेस** यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा **२६.२०% कमी** दराच्या निविदेच्या मान्यतेसाठी शिफारस केली आहे.

तरी **मे. साई गणेश एंटरप्रायजेस** यांच्या वाटाघाटी अंती अंदाजपत्रकीय दरापेक्षा **२६.२०% कमी** दराच्या निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३(क) अन्वये मा. आयुक्त तथा प्रशासक हयांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

या कामी संविदा मंजुरी प्राप्त करणे, लघुत्तम निविदाधारकासोबत करारनामा करुन कार्यादेश देणे, काम सुरु करुन विहीत मुदतीत पुर्ण करणे व देयक सादर करणे इ. सर्व प्रक्रिया पुढील नमुद कालमर्यादेत पुर्ण होणे अपेक्षित आहे.

| अ.क्र | बाब | अपेक्षित दिनांक |
|---|---|---|
| १ | प्रशासकीय व वित्तीय मान्यता ठराव | मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे कडील ठ.क्र. ३४९, दि. २१/०४/२०२५ |
| २ | प्र. शहर अभियंता यांची तांत्रिक मंजुरी घेणे. | दि. २६/०५/२०२५ |
| ३ | निविदा प्रसिध्द करणे. | दि. २७/०६/२०२५ |
| ४ | प्रथम लिफाफा उघडणे. | दि. ०४/०७/२०२५ |
| ५ | द्वितीय लिफाफा उघडणे. | दि. २९/०७/२०२५ |
| ६ | संविदा मंजुरी ठराव. | दि. १०/१०/२०२५ |
| ७ | कार्यादेश देणे/ करारनामा करणे. | दि. १४/१०/२०२५ |
| ८ | काम सुरु करणे. | दि. १५/१०/२०२५ |
| ९ | काम पुर्ण करणे. | दि. १४/११/२०२५ |
| १० | देयक सादर करणे. | दि. २१/११/२०२५ |
| ११ | देयकाचे प्रदान करणे. | दि. २८/११/२०२५ |

**ठराव:-** सदर काम खालील नमुद कालावधीत पुर्ण होणे अपेक्षित आहे.


| अ.क्र | बाब | अपेक्षित दिनांक |
|---|---|---|
| १ | प्रशासकीय व वित्तीय मान्यता ठराव | मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे कडील ठ.क्र. ३४९, दि. २१/०४/२०२५ |
| २ | प्र. शहर अभियंता यांची तांत्रिक मंजुरी घेणे. | दि. २६/०५/२०२५ |
| ३ | निविदा प्रसिध्द करणे. | दि. २७/०६/२०२५ |
| ४ | प्रथम लिफाफा उघडणे. | दि. ०४/०७/२०२५ |
| ५ | द्वितीय लिफाफा उघडणे. | दि. २९/०७/२०२५ |
| ६ | संविदा मंजुरी ठराव. | दि. १०/१०/२०२५ |
| ७ | कार्यादेश देणे/ करारनामा करणे. | दि. १४/१०/२०२५ |
| ८ | काम सुरु करणे. | दि. १५/१०/२०२५ |
| ९ | काम पुर्ण करणे. | दि. १४/११/२०२५ |
| १० | देयक सादर करणे. | दि. २१/११/२०२५ |
| ११ | देयकाचे प्रदान करणे. | दि. २८/११/२०२५ |

सदर कामाकरीता वरील नमुद केलेल्या कालमर्यादा पाळल्या न गेल्यास संबंधित विभाग प्रमुख व त्यांचे अधिनस्त कर्मचारी MCSR १९७९ प्रमाणे कार्यवाहीस पात्र राहतील तसेच सदर कामामध्ये काही अपरिहार्य कारणास्तव (तांत्रिक, नैसर्गिक व इतर सबब कारणास्तव) विलंब झाल्यास त्या-त्या वेळी विलंबास सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी घेणे बंधनकारक राहील. तरी वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील **वॉर्ड क्र. ११२ मधील पाम इन्फ्रास्ट्रक्चर इमारतीकडे आर.सी.सी. पाईप क्रॉसिंग करणे** कामी सहभागी झालेल्या निविदाधारकापैकी **मे. साई गणेश एंटरप्रायजेस** हयांची वाटाघाटी अंती अंदाजपत्रकीय दरापेक्षा **२६.२०% कमी** दराची निविदा मंजुर करण्यात येत असुन लघुत्तम निविदाधारकासोबत संविदा करणे, २% सुरक्षा अनामत भरणे तसेच करारनामा, कार्यादेश देणे तसेच नामंजुर ठेकेदाराची इसारा रक्कम परत करणे करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ७३(क) अन्वये मान्यता देणेत येत आहे. तसेच एस्टीमेट मधील प्रत्येक टप्प्यावर केलेल्या कामाचे Geo Tagged फोटोग्राफ्स सादर करणेत यावे. नंतरच कामाची रक्कम अदा करणेत यावी.

(अजित मुठे)
उपायुक्त परिमंडळ-३
प्रभाग समिती आय
वसई विरार शहर महानगरपालिका